# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ४ थे अंक ३८ वा मंगळवार दि.०९ जुलैं २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## रेणापूर येथील श्री रेणुकादेवी मंदिर परिसरातील भक्त निवास बांधकामाची आ. रमेशआप्पा कराड यांच्याकडून पाहणी





लातूर : – रेणापूर येथील असंख्य भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या आदिशक्ती श्री रेणुका देवी मंदिर परिसरात कोट्यावधी रुपये खर्चाच्या भक्तनिवास बांधकामासह इतर सुरू असलेल्या विकास कामांची पाहणी करून भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी समाधान व्यक्त केले.

श्री रेणुका देवी मंदिर तीर्थक्षेत्रास शासनाचा 'ब' दर्जा मिळाला आहे. या मंदिर परिसरात भाविक भक्ताना सोयी सुविधा मिळाव्यात यासाठी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी शासनाच्या नगरविकास विभागाकडून भक्तनिवास बांधकामा करिता तब्बल एक कोटी रुपयाचा निधी उपलब्ध करून दिला होता. सदरील निधीतून अत्यंत देखणे आणि सर्व सोयीने युक्त भक्त निवास बांधकाम पूर्णत्वास आले आहे. या कामासह नव्याने मंजूर झालेल्या तीन कोटी रुपये खर्चाच्या भक्त निवास, दर्शन रांग आणि प्रसादालय या नियोजित कामाची पाहणी आ रमेशआप्पा कराड यांनी केली. सुरू असलेल्या कामाबद्दल समाधान व्यक्त करून होणारी कामेही दर्जेदार व्हावीत अशी अपेक्षा यावेळी त्यांनी व्यक्त केली.

मंदिर परिसरात येताच आ. कराड यांनी श्री रेणुका मातेची आरती करून मनोभावे दर्शन घेतले. यावेळी मंदिर ट्रस्टच्या अध्यक्ष तथा तहसीलदार मंजुषा भगत, सहअध्यक्ष राम पाटील, बापू गिरी, दिलीप आकनगिरे यांनी तसेच शहर भाजपाच्या वतीने आ. रमेशआप्पा कराड यांचा यथोचित सत्कार करून आभार व्यक्त केले. यावेळी भाजपाचे अनिल भिसे, ॲड दशरथ सरवदे , रेणापूरचे पहिले नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे, संगायो समिती अध्यक्ष वसंत करमुडे, चंद्रकांत कातळे, शरद दरेकर, श्रीकृष्ण पवार, अच्युत कातळे, संतोष राठोड, विजय चव्हाण, दत्ता सरवदे, उत्तम चव्हाण, शेख अजीम, राजकुमार आलापुरे, उज्वल कांबळे, लखन आवळे, नरसिंग येलगटे, महेश गाडे, अंतराम चव्हाण, दिलीप चव्हाण, रमेश चव्हाण, हनुमंत भालेराव, सचिन शिरसकर, गणेश चव्हाण, मनोज चक्रे, जगन्नाथ कातळे, नंदू बंडे, गणेश माळेगावकर, सुरज फुलारी, रोहित खुमसे, नंदकुमार मोटेगावकर, गणेश चव्हाण, महेश वरवटे व्यंकट आकनगिरे, यांच्यासह भाजपाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## इनरव्हील क्लब ऑफ लातूर डिस्ट्रिक्ट ३१३ यांच्यावतीने गरजू व गरीब २९ महिलांना डबल बेडशीट वाटप



लातूर :– इनरव्हील क्लब ऑफ लातूर डिस्ट्रिक्ट ३१३ यांच्या वतीने गरजू व गरीब २९ महिलांना डबल बेडशीट वाटप करण्यात आले. इनरव्हील क्लब ही जागतिक पातळीवर समाजसेवा करणारी एकमेव संस्था आहे. नेहमी समाजातील गरज पाहून प्रोजेक्ट टाकत असते आणि गरजू लोकांसाठी तत्पर कार्य करण्यात सज्ज असते. त्याचाच एक भाग म्हणून नाना नानी पार्क येथील महादेव मंदिरासमोरील गरजू व गरीब समाजातील २९ महिलांना डबल बेडशीट वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून अशोक हनवते संपादक दैनिक महावृत्त तथा जिल्हा सरचिटणीस महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई जिल्हा शाखा लातूर हे होते. इनरव्हील क्लब च्या अध्यक्ष सौ सारिका गांधी, सौ अनुराधा अग्रवाल, उत्कर्षा भालके, सौ रेशमा बोरा, सौ अनुराधा कडेल, सौ मीना चंदिले, लातूरातील नामांकित हास्य कवी संजय जमदाडे, रोटरी क्लबचे माजी अध्यक्ष गोविंद कुंचमवार आदि उपस्थित होते.

## आमदार धिरज विलासराव देशमुख यांची मागणी; पावसाळी अधिवेशात मांडली लक्षवेधी



लातूर , प्रतिनिधी : मराठा आरक्षण व सगेसोयरे संबंधीचा मुद्दा ऐरणीवर येवूनही याकडे शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे. शासनाने प्राप्त हरकतींची छाननी करून सगेसोयरे अधिसूचनेला जलद गतीने अंतिम रूप देण्याची नितांत आवश्यकता आहे. याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करावी अशी मागणी लातूर ग्रामीणचे आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी विधानसभेत सोमवारी ( ८ जुलै ) केली. सध्या पावसाळी अधिवेशन सुरू असून लातूर ग्रामीणचे आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी लक्षवेधी मांडून मराठा आरक्षणाकडे सरकारचे लक्ष वेधून घेतले. मराठा कुणबी नोंदी सापडलेल्या व्यक्तींच्या सगेसोयऱ्यांना कुणबी दाखले देण्यासंदर्भात शासनाने २६ जानेवारी रोजी प्रारूप अधिसूचना प्रसिद्ध केली. याबाबत जनतेच्या हरकती व सूचना मागवण्यात आल्या. १६ फेब्रुवारीपर्यंत ८ लाखांहून अधिक हरकती प्राप्त झाल्या. यासाठी चार महिन्यांपेक्षा अधिक चा कालावधी झाला. त्याची छाननी न झाल्याने सगेसोयरे अधिसूचना कायद्यात रुपांतरित होवू शकली नाही. त्यासाठी विलंब होत असल्याने मराठा समाज बांधवांची ठिकठिकाणी आंदोलने सुरू आहेत. काही बांधवांनी आत्महत्याही केल्या आहेत, असे आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी सांगितले. कुणबी दाखला वेळेत न मिळाल्याने नोकरी भरती व शैक्षणिक सवलतींचा लाभ घेण्यात अडचणी आल्या. त्यामुळे अनेक बांधवांवर खुल्या प्रवर्गातून अर्ज करण्याची वेळ आली. सगेसोयऱ्यांसंबंधी कायद्याची अंमलबजावणी व्हावी आणि अन्य मागण्यांसाठी श्री. मनोज जरांगे पाटील यांनी जून महिन्यात आंदोलन केले. सरकारने १३ जुलैपर्यंतचा अवधी दिला. पण हा कालावधी संपत आला तरी सरकारने आश्वासन पाळले नसल्याने मराठा समाज बांधवांमध्ये तीव्र नाराजी आहे. म्हणून जरांगे पाटील यांना पून्हा शांतता रॅली काढावी लागत आहे. त्यामुळे सरकारने तातडीने योग्य ती पावले उचलावीत आणि मराठा समाजाला दिलासा द्यावा, असेही आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी सांगितले.






## मुख्यमंत्री – माझी लाडकी बहीण योजनेपासून एकही पात्र लाभार्थी वंचित राहू नये– आ.कराड रेणापूर येथे माझी लाडकी बहीण योजनेचा आ. कराड यांच्या हस्ते शुभारंभ

लातूर : – राज्यातील महायुती शासनाने महिलाच्या प्रगतीसाठी आणि उन्नतीसाठी अनेक योजना सुरू केल्या असून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत महिलांना दरमहा पंधराशे रुपये देण्याचा ऐतिहासिक क्रांतिकारी निर्णय महायुती शासनाने घेतला आहे तेव्हा या योजनेपासून एकही पात्र महिला वंचित राहणार नाही याची काळजी संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी घ्यावी असे आव्हान भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी केले.

राज्यातील महायुती शासनाने नव्याने सुरू केलेल्या मुख्यमंत्री – माझी लाडकी बहीण या योजनेचा शुभारंभ रेणापूर येथे भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या शुभहस्ते रविवारी करण्यात आला. यावेळी रेणापूरच्या तहसीलदार मंजुषा भगत, गटविकास अधिकारी सुमित जाधव, नगरपंचायतीचे मुख्याधिकारी मंगेश शिंदे, बाल विकास प्रकल्प अधिकारी बी. एच. निपानीकर, सौ. एस. एस. क्षिरसागर, भाजपाचे विधानसभा अध्यक्ष अनिल भिसे, तालुका अध्यक्ष ॲड. दशरथ सरवदे ,रेणापूरचे पहिले नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे, सांगायो समिती अध्यक्ष वसंत करमुडे, नायब तहसीलदार कानडे यांच्यासह अधिकारी, कर्मचारी, लोकप्रतिनिधी, महिला लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

राज्यातील महायुती शासन महिलांचा सन्मान करणारे असून महिलांना प्रवासात ५० टक्के सवलत यासह विविध योजना सुरू केली आहेत. महिलांना दीड हजार रुपये दरमहा अनुदान देण्याचा निर्णय आजपर्यंत राज्यातील कोणत्याही शासनाने घेतला नाही असे सांगून यावेळी बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, लाडकी बहीण ही योजना अधिकाधिक महिलांना लाभ मिळावा यासाठी शासनाने नियमात बदल केले आहेत. बऱ्याच अटी शिथिल केल्या आहेत. योजनेचा लाभ मिळवण्यासाठी महिलांनी कोणालाही एक रुपया देण्याची गरज नाही. संयमाने परिपूर्ण अर्ज दाखल करावेत निश्चितपणे या योजनेचा सर्वच पात्र महिलांना लाभ होईल असेही त्यांनी बोलून दाखवले.

देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी साहेब यांनी जनधन योजनेअंतर्गत बहुतांशी महिलांचे विविध बँकेत खाते काढले असून सर्वच बँकांना एक रुपयात खाते काढण्याचे आदेश दिल्यानेच लातूर जिल्हा बँकेला एक रुपयात महिलांचे खाते काढण्याची घोषणा करावी लागली अशी माहिती देऊन भाजपा कार्यकर्त्यांनी पदाधिकाऱ्यांनी अधिकाधिक महिलांना माझी लाडकी बहीण या योजनेचा लाभ मिळावा यासाठी प्रयत्न करावेत असेही आव्हान आ. रमेशआप्पा कराड यांनी केले

यावेळी माझी लाडकी बहीण या योजनेचा परिपूर्ण अर्ज भरून या योजनेचा आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. अर्ज दाखल केलेल्या महिलांना वृक्षाचे रोपटे भेट देण्यात आले. तर महिलांच्या वतीने यावेळी आ. कराड यांचा सत्कार करून ही योजना शासनाने सुरू केल्याबद्दल आभार व्यक्त केले. रेणापूर शहर भाजपाच्या वतीने आ. कराड यांचा याप्रसंगी येथे सत्कार करण्यात आला. तहसीलदार मंजुषा भगत यांनी यावेळी उपस्थित महिलांना सदरील माझी लाडकी बहीण या योजनेची सविस्तर माहिती दिली. शेवटी नपंचे मुख्याधिकारी मंगेश शिंदे यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमृतेश्वर स्वामी यांनी केले. या कार्यक्रमास रेणापूर शहर आणि परिसरातील महिलांची मोठी संख्या होती.





यावेळी भाजपाचे सुकेश भंडारे, शरद दरेकर, चंद्रकांत कातळे, श्रीकृष्ण पवार, अच्युत कातळे, संतोष राठोड, विजय चव्हाण, दत्ता सरवदे, उत्तम चव्हाण, शेख अजीम, राजकुमार आलापुरे, उज्वल कांबळे, लखन आवळे, नरसिंग येलगटे, महेश गाडे, अंतराम चव्हाण, मारुफ अत्तार, दिलीप चव्हाण, रमेश चव्हाण, हनुमंत भालेराव, सचिन शिरसकर, गणेश चव्हाण, अवेज कुरेशी, मनोज चक्रे, जगन्नाथ कातळे, नंदू बंडे, गणेश माळेगावकर, सुरज फुलारी, रोहित खुमसे, नंदकुमार मोटेगावकर, गणेश चव्हाण, महेश वरवटे व्यंकट आकनगिरे, सुनील राठोड यांच्यासह भाजपाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संपादकीय....

# ब्रिटनमधील सत्तांतर आणि भारत संबंध

जगातील दोन देशांमध्ये सत्ता परिवर्तन झाले आहे. ब्रिटनमध्ये मजूर पक्षाचे नेते कीर स्टार्मर यांनी पंतप्रधानपदाची जबाबदारी स्वीकारली आहे. इराणमध्ये मसूद पेझेश्कियान अध्यक्षपदाच्या निवडणुका जिंकून सत्तेवर आले आहेत. हे दोन्ही बदल भारतासाठी महत्त्वाचे आहेत. हुजूर पक्षाच्या राजवटीत भारत आणि ब्रिटनमधील संबंध दृढ झाले होते. हे संबंध अधिक दृढ करण्यात ब्रिटनचे पंतप्रधान ऋषी सुनाक यांनी महत्त्वाची भूमिका बजावली; मात्र दोन्ही देशांमधील मुक्त व्यापार करार अद्यापही रेंगाळलेला आहे.मजूर पक्षाची धोरणे सुरुवातीपासूनच नेहमीच भारतविरोधी राहिली आहेत; मात्र गेल्या काही वर्षांत मजूर पक्षानेही भारताविरोधात विधाने करणे टाळायला सुरुवात केली आहे. यामध्ये स्टार्मर यांची भूमिका महत्त्वाची आहे. त्यांची ही वृत्ती पाहून भारत आणि ब्रिटनमधील संबंध सुधारण्याची शक्यता आहे. पक्षाच्या जाहीरनाम्यात नमूद केलेल्या गोष्टींवरून हे स्पष्ट झाले आहे. ब्रिटनमधील अन्य राजकीय पक्षांपेक्षा मजूर (लेबर) पक्षाने कथित मानवाधिकार उल्लंघन आणि काश्मीर प्रश्न यासारख्या इतर मुद्द्यांवर वेळोवेळी आवाज उठवला आहे. जेरेमी कॉर्बिनच्या नेतृत्वाखाली मजूर पक्षाने सप्टेंबर २०१९ मध्ये वार्षिक परिषदेत काश्मीरमधील परिस्थितीवर आणीबाणीचा ठराव मंजूर केला. ऑगस्ट २०१९ मध्ये जम्मू आणि काश्मीरचा विशेष दर्जा संपुष्टात आणण्याच्या भारत सरकारच्या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर आलेल्या या प्रस्तावात म्हटले आहे की, या प्रदेशात मानवतेवर संकट आहे आणि काश्मिरी लोकांना अधिकार दिला पाहिजे. कॉर्बिनच्या नेतृत्वाखालील मजूर पक्षाचा हा ठराव निराधार असल्याचे भारत सरकारने तेव्हा म्हटले होते. पुढे कॉर्बिन यांना २०२० मध्ये एका वादानंतर मजूर पक्षातून निलंबित करण्यात आले होते. यानंतर मजूर पक्षात परिवर्तनाचा काळ सुरू झाला. स्टार्मर यांच्या नेतृत्वातील मजूर पक्षाने जाहीरनाम्यात भारतासोबत नवीन धोरणात्मक भागीदारी पुढे नेण्याचे वचन दिले, ज्यामध्ये मुक्त व्यापार कराराचा समावेश असेल, तसेच सुरक्षा, शिक्षण, तंत्रज्ञान आणि हवामान बदल यासारख्या क्षेत्रांमध्ये सहकार्य वाढवणे. याशिवाय स्टार्मर यांनी काश्मीर प्रश्न हा भारत आणि पाकिस्तानचा अंतर्गत मुद्दा असल्याचे म्हटले आहे. हा प्रश्न चर्चेने सोडवला पाहिजे असेही त्यांचे मत आहे. मजूर पक्षाचा भारताकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला असल्याचे यामुळे म्हटले जात आहे. पक्षाच्या या भूमिकेमुळे ब्रिटनचे भारतासोबतचे संबंध अधिक दृढ होण्यास मदत होईल. सध्या ब्रिटनचे अमेरिकेशी संबंध चांगले नाहीत. हे आव्हान पेलण्यासाठी स्टार्मर यांना परराष्ट्र धोरणात लवचिकता आणावी लागेल. त्यांना एक संतुलित आणि व्यावहारिक नेता म्हणून ओळखले जाते. त्यांना भारत आणि ब्रिटनमधील संबंध सुधारावे लागतील. मात्र, भारत आणि ब्रिटनमधील संबंधांचा पुढचा प्रवास आव्हानात्मक असू शकतो, असा इशारा आंतरराष्ट्रीय घडामोडींचे अभ्यासक क्षितिज वाजपेयी यांनी दिला आहे.ब्रिटनच्या परराष्ट्र धोरणाचा थेट परिणाम भारताच्या संबंधांवर होतो. हुजूर पक्षाचे ब्रिटनचे माजी पंतप्रधान ऋषी सुनाक हे मूळचे आशियाई आहेत. भारतात त्यांचे वंशज आहेत. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि ब्रिटनचे पंतप्रधान सुनाक यांच्या नात्यात नवा उत्साह संचारला होता. असे असूनही दोन्ही देशांमध्ये मुक्त व्यापार करार होऊ शकला नाही. भारतासोबतचे संबंध सुधारण्यासाठी हा करार सर्वात मोठे आव्हान असेल. दोन्ही देशांदरम्यान मुक्त व्यापार करार झाला, तर नव्या संबंधाचा पाया रचला जाईल. ही पायाभरणी करण्यासाठी संभाव्य परराष्ट्रमंत्री डेव्हिड लॅमी जुलै महिन्यात भारत दौर्‍यावर येणार असल्याचे बोलले जात आहे. यावेळी मुक्त व्यापार करारासाठी एकमत होण्यासाठी प्रयत्न केले जातील. या व्यापारासाठी दोन्ही देशांमध्ये २६ मुद्द्यांवर एकमत झाले आहे. भारतासोबत मुक्त व्यापार करारावर स्वाक्षरी करण्याच्या मार्गात भारतीय कामगार हाही मोठा अडथळा आहे. हे कामगार वर्क परमिटवर ब्रिटनमध्ये येऊन स्थायिक होतात. अशा परप्रांतीयांना रोखण्यासाठी लेबर पक्षाने आश्वासन दिले आहे. पक्षाने आपल्या निवडणूक प्रचारात अशा स्थलांतरितांची संख्या कमी करण्याचे आश्वासन दिले होते. बहुतेक भारतीय स्थलांतरित हे आयटी क्षेत्रात काम करणारे आहेत. ब्रिटनमध्ये राहणार्‍या ६.८५ लाख स्थलांतरितांमध्ये भारतीय वंशाच्या लोकांची संख्या मोठी आहे. ब्रिटनला आपली राष्ट्रीय आरोग्य व्यवस्था आणि आयटी क्षेत्र सुधारण्यासाठी अधिक कुशल व्यावसायिकांची गरज आहे; पण ब्रिटनला असे व्यावसायिक फक्त भारतातीलच नसावेत असे वाटते. भारतीयांचा वरचष्मा राहू नये म्हणून जगातील इतर देशांतील व्यावसायिकांनीही या क्षेत्रात यावे, असे ब्रिटनचे मत आहे.जगातील दुसर्‍या सत्ता परिवर्तनात इराणमध्ये तेथील कट्टरतावादाची जागा सुधारणावादाने घेतली आहे. भारतासाठी हे चांगले झाले आहे. इराणमध्ये माजी राष्ट्राध्यक्ष इब्राहिम रायसी यांचा हेलिकॉप्टर अपघातात मृत्यू झाला. राष्ट्राध्यक्ष रायसी यांच्या काळात भारताचे इराणशी चांगले संबंध होते. राष्ट्राध्यक्ष रायसी यांच्या मृत्यूनंतर इराणमध्ये राष्ट्राध्यक्षपदाची निवडणूक घेण्यात आली. यामध्ये मसूद पेझेश्कियान यांचा विजय झाला. पाश्चिमात्य देशांशी चांगले संबंध निर्माण करण्याचे ते पुरस्कर्ते आहेत. भारत नवीन सरकारसोबत आणखी चांगल्या संबंधांची अपेक्षा करेल. आता नवे राष्ट्राध्यक्ष पेझेश्कियान यांना भारतासोबत कशा प्रकारचे संबंध ठेवायचे आहेत, यावर ते अवलंबून असेल; मात्र निवडणूक निकाल येण्यापूर्वीच इराणचे भारतातील राजदूत इराज इलाही यांनी इराणची भूमिका मांडली होती. सत्तेत कोणीही आले, तरी इराण आणि भारताच्या परराष्ट्र धोरणात कोणताही बदल होणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले होते.

# पंढरपूरचा विठ्ठल देव आहे का ? वास्तविक पाहता पंढरपूरचा विठ्ठल, विठोबा, पांडुरंग, पंढरीनाथ, विठाई इत्यादि नांव असणारा हा पंढरपूरचा विठ्ठल देव आहे का?

कारण विठ्ठल जर देव असता तर विठ्ठलाचा उल्लेख वैदिक ब्राम्हणाच्या धर्मसूत्रात म्हणजे रुग्वेद - यजुर्वेद - सामवेद व अथर्ववेदात असता परंतु यात उल्लेख नाही. स्मृती - श्रृती, वेद पुराण, - उपनिषद - अरण्यक- मनूस्मृती या तमाम ब्राम्हणी वैदिक धर्म ग्रंथात विठ्ठलाचे नाव नाही

तसेच विठ्ठल हे नांव रामायणात नाही. विठ्ठल महाभारतात नाही. विठ्ठल साक्षात भगवान श्रीकृष्णाच्या गीतेत ही नाही म्हणजे वैदिक धर्माचे स्वरुप जानणार्‍या वेदांच्या सर्वश्रेष्ठ ब्राम्हणी ग्रंथात जर विठ्ठलाचे कोठे ही नांव नाही तर ह्या सर्व पुराव्या वरुन हेच सिद्ध होते की पंढरपूरचा विठ्ठल हा देव नसून तो एक महामानव आहे

विठ्ठलाच्या मूर्तीकडे नीट पाहिलेत तर काही गोष्टी लक्षात येतात कि, विठ्ठलाचे डोळे, त्याचे खांद्यावर रुळणारे लांब कान आणि कपाळ विशाल आहे. इतर वैदिक देव-देवता सारखे विठ्ठलाने हातात कोणतेही हिंसा करनारे शस्त्रे नाहीत, आयुधे धरलेले नाही की कोणतेही हत्यार नाही, विठ्ठलाला चार हात नाहीत, तो आपले दोन कमलहस्त आपल्या कमरेवर ठेऊन उभा आहे तसे करून जणू तो जगाला आपल्या लेकरांना, उपासकांना म्हणजेच वारकर्‍यांना अहिंसेचा संदेश देत आहे अर्थात पंढरपूरचा विठ्ठल हा अहिंसेचा पुरस्कर्ता महामानव आहे देव नाही

तसेच समतेने- ममतेने, बंधूभावाने, प्रेमाने, आपुलकीने वागवणारा असा पंढरीच्या विठ्ठला मध्ये कुठलाच भेदभाव नाही, उच्चनिचता नाही, गैरबराबरी नाही

विठ्ठलाला होमहवन- अभिषेक करण्याची गरज लागत नाही, त्याला दक्षिणा वाहण्याची गरज नाही, त्याला भट-ब्राह्मणाची मध्येस्थही लागत नाही आणि त्याच्या पूजेसाठी मंत्र- तंत्र म्हणण्याची सुद्धा गरज नाही. फक्त मुखाने नामाचा गजर केला तरी चालतो. तो प्रसन्न हसतो आहे. विठ्ठलाची अहिंसक शांत मूर्तीच तो कोणी तरी महामानव असण्याचे प्रतिक आहे. अर्थात पंढरपूरचा विठ्ठल देव नाही

संत नामदेव ......

वारकरी संप्रदायाचे संस्थापक मानले जातात ते आपल्या वारकरी संत सहकार्यांना पंढरपूरच्या विठ्ठलाची ओळख करून देताना सांगतात.....

बौद्ध अवतारी आम्ही झालो संत ।<br>
वर्णावया मात नामा म्हणे ।।

तुझा बुद्धावतार वर्णन करण्यासाठी म्हणजे बुद्धविचार लोकांना सांगण्यासाठी आणि बौद्धावतारात तु कशी वैदिकांवर मात केली होती ते वर्णन करण्यासाठी आम्ही संत झालो आहोत, अशा शब्दात नामदेव महाराज अवतारकार्य सांगतात

पुढे जाऊन संत नामदेव महाराज विठ्ठला हा तथागत बुद्धच आहे असे आपल्या अभंगात सांगतात

गोकुळी अवतारू सोळा सहस्त्रावरू ।<br>
आपण योगेश्वरु बौद्ध रुपी ।।<br>
व्रतभंगासाठी बौद्ध अवतार ।<br>
झाला दिगंबर अवनिये ।<br>
ऐसा कष्टी होऊनी बौद्ध राहिलासी ।।<br>
धर्म लोपला अधर्म जाहला हे तू न पाहसी ।या<br>
लागी बौद्ध रूपे पंढरी नांदसी ।।

संत तुकाराम महाराज...........

बौध्यअवतार माझिया अदृष्टा ।मौन्य मुखें निष्ठा धरियेली ।।१।।<br>
आलें कलियुग माझिया संचिता । डोळां हाकलितां न पडेसी ।।२।।<br>
म्यांच तुझें काय केलें नारायणा । कां नये करुणा तुका म्हणे ।।३।।<br>
(अंभग२५६०)

मौन धारण केलेला हा बौद्धअवतार माझ्या वाट्याला आला आहे. लोकांसाठी शाम चतुर्भुज झाला आहे. संतांशी गुजगोष्टी करत आहे. माझ्या भाग्यात हे कलियुग आलं आहे, तुझं रुप डोळ्यापुढून हाकललं तरी जात नाही. तुकाराम महाराज म्हणतात, मीच तुझं असं काय घोडं मारलं आहे की तुला माझी कींव येत नाही? संत तुकाराम महाराज म्हणतात बुद्ध अवतार मी पाहिलेला नाही. मुखाने मौन धरण्याची निष्ठा तू धारण केली पण प्रत्यक्षात आपल्याला बुद्ध पाहता आलेला नाही ही एक प्रकारची खंत व्यक्त केलेली आहे.

बुद्धावतारात, बुद्ध सतत भ्रमण करत. नीती- अनिती, धर्म, समजून सांगत. लोकांना उपदेश करत. पण विठ्ठलाने मात्र मौन धारण केलं आहे. दोन्ही हात कटीवर ठेऊन तो उभा आहे. त्याचं मौन हे सामान्य लोकांसाठी आहे, मात्र तो संतांशी गुजगोष्टी करतो असं तुकाराम महाराज सांगतात*

लोकांचियेसाठी शाम चतुर्भुज ।<br>
संतांसवें गुज बोलतसां ।।

चतुर्भुज होणं म्हणजे बंधनात बांधलं जाणं. सामान्य लोकांसाठी विठ्ठल बंधनात बांधलेला आहे, पण संतांशी मात्र तो गुजगोष्टी करतो...........

संत एकनाथ

बुद्धाला बोधाई माऊली म्हटलं आहे.

बोधोनि सकळही लोका ।*<br>
बोधे नेले त्रिविध तापवो ।।<br>
बौद्धरुपें नांदसी । बोलेविना बोलणे एक वो ।।<br>
साधक बाधक जेथे एकपणेच बोधविसी वो ।<br>
ऊदो म्हणो ऊदो बोधाई माऊली हो ।।

किंवा

लोक देखोनि उन्मत्त । दारांनी आसक्त ।।<br>
न बोले बौद्धरुप । ठेविले जघनी हात ।।<br>
धर्म लोपला अधर्म जाहला ।हे तु न पाहसी ।।<br>
या लागे बौद्धरुपें पंढरी नांदसी ।।

संत जनाबाई

होऊनिया कृष्ण कंस वधियेला।<br>
आता बुद्ध झाला सखा माझा ।।<br>
लोक देखोनी उन्मत ।<br>
दारांनी आसक्त<br>
न बोले बौद्धरुप<br>
ठेविले जघनी हात ।।

संत बहिणाबाई

कलियुग हरी । बुद्ध रुप धरी ।<br>
तुकोबा शरीरी प्रवेशला ।।

संत तुकारामाच्या तोंडून साक्षात तथागत बुद्धच बोलत आहेत, असे संत बहिणाबाई सूचित करतात

तसेच,....संत संप्रदाय बुध्दालाच विठ्ठल मानताना म्हणतात -

संत तया दारी, तिष्ठताती निरंतरी ।<br>
पुंडलिकासाठी उभा । धन्य धन्य विठ्ठल शोभा ।।<br>
बौध्द अवतार घेऊन विटे समचरण ठेऊन ।<br>
लोक देखोनि उन्मत्त दारांनी आसक्ता ।<br>
न बोले बौध्द रूप ठेवीले जघनी हात ।।

भक्तीविजय

कलियुगी प्रत्यक्षा पाषाण रूपी,<br>
बौध्दरूपे असता श्रीपती ।<br>
जनांसी दाखवूनी नाना प्रचिती,<br>
वाढविली कीर्ती संताची ।।

संतविजयअध्दाय १० महिपतीबुवा ताहाराबादकर(कांबळे)

कलियुगामाजे साचार । असत्य भाषण झाले फार<br>
यास्तव बौध्द अवतार । देवे सत्वर घेतला।।

स्वानुभव दिनकर ..........

कळिचा प्रातुर्भव देखोनी,*<br>
बुध्दियोगे आवडे उगेपणी ।<br>
बौध्दावताराचिया आयणी ।।

संत चोखोबा महार

शुद्ध चोखामेळा । करी नामाचा सोहळा ।।१।।<br>
मी यातिहीन महार । पूर्वी निळाचा अवतार ।।२।।<br>
कृष्णनिंदा घडली होती । म्हणोनि महार जन्मप्राप्ती ।।३।।<br>
चोखा म्हणे विटाळ । आम्हा पूर्वीचे हे फळ ।।४।।<br>
(कदम ग्रंथ अभंग:पृ.११)

चोखोबा महार निळाचा अवतार म्हणजे मूळ नागवंश होय. ( तथागत बुद्ध नागवंशिय होते) कृष्णाचा अंत नागवंशीयाकडून झाला. हीच कृष्णनिंदा झाली आणि म्हणून महार जन्म झाला असे चोखोबा या अभंगातून सांगतात

चोखोबा महार अर्थात् अस्पृश्य जातीचे असुनही त्यांचे संपुर्ण कुटुम्ब वारीकरी संप्रदायाचे निष्ठावान वारिकरी बनुनी अमानवतावादि वैदिक ब्राह्मणी व्यवस्थेच्या विरोधात संघर्ष करित होते संत चोखोबा म्हणतात.....

कली माजी देव बुद्ध रुप जाला ।<br>
शरण शरणवाणी शरण तिवाचा विणवणी ।।<br>
कली युगातिल बुद्ध आमचे दैवात आहे. त्याला त्रिवार शरण जातो

संत चोखोबाची पत्नी संत सोयाराबाई

देहासी विटाळ म्हणती सकल ।<br>
आत्मा तो निर्मळ शुद्धबुद्ध<br>
देहीचा विटाळ देहिच जन्मला<br>
सोवळा तो झाला कवण धर्म ।।


संत चोखोबाचा मुलगा संत कर्म मेळा

आमुची केली हीन याती ।<br>
तुज का न कळे श्रीपती<br>
जन्म गेला उष्टे खाता<br>
लाज न ये तुमचे चित्ता ।।

संत चोखोबाचा मेव्हणा संत बंका महार आणि मुलगी संत निर्मला

हाती न घेता तलवार<br>
बुद्ध राजकरी जगावर ।<br>
ऐकोनी बंका करित उत्तर<br>
बुद्ध अवतार पांडुरंग ।।

सामाजिक आणि सांस्कृतिक विषमता नष्ट करण्याची भुमिका संत चोखोबा व त्यांच्या कुटुंबियांनी घेतली खरी, पण शेवटी ते आपल्या नशिबाला किंवा प्रारब्धाला शरण का गेले? कारण या काळात आपेगाव पैठणच्या ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरीच कर्ममार्ग तत्वज्ञानाचा



समाज जीवनात मोठा प्रभाव होता आपेगावच्या ज्ञानेश्वरीची ज्ञानेश्वरीतील ही ओवी

कर्म पराधिनपणे । निपजते प्रकृतिपूर्ण<br>
म्हणून संग जंव प्रकृतीचा । तंव त्याग त घड़े कर्माचा (ज्ञा.३:६ ३)

कर्म अर्थात नशीब प्रकृतितुन म्हणजे पुनर्जन्मातुन निपजते, तेव्हा माणूस कर्माच्या बंधनातुन मुक्त नाही

संत चोखोबांचे अख्ख कुटूंब विठ्ठलमय अर्थात् बौद्धमय झालेले पाहुन वैदिक ब्राह्मणाने संत चोखोबाची भिंती खाली चिरडुन हत्या केली वैदिक ब्राह्मणाचा एवढा दहशतवाद की संत चोखोबाचे प्रेत भिंती खालुन काढण्याची कोणाचिही हिम्मत नव्हती

वैदिक ब्राम्हणी व्यवस्थेने संत चोखाबाची केलेली हत्या, संत कबीर व संत रोहिदासा नंतरची तिसरी हत्या आणि महाराष्ट्रात झालेली संताची पहली हत्या होती.

परंतु एक लक्षात असू द्या.........

मरण आहे या सकळा ।<br>
भेणे अवकळा अभयमोल ।।

मरणाच्या भिती पेक्षा मरणाची प्रतिष्ठा महत्वाची असते. जेव्हा संत चोखोबाच्या हत्या झाली तेंव्हा संत नामदेव उत्तरेत होते. संत नामदेवानी चोखोबाची हाडं एकत्र करून पंढरपूर येथील विठ्ठल मंदिराच्या पहिल्या पायरीवर चोखोबाची समाधी केली

अस्पृश्य जातीचे संत चोखोबा महार विठ्ठलाच्या पहिल्या पायरीचे तमाम संताचे प्रेरणा स्थान झाले.

संत मनोभावे म्हणू लागले

कलियुगी प्रत्यक्षा पाषाणरुपी ।<br>
बौद्धरुपी असता श्रीपती ।।<br>
जनांसी दाखवूनी नाना प्रचिती<br>
वाढविली किर्ती संताची ।।

या सर्वांवरुन विठ्ठल हा बुद्धच आहे असं संत परोपरीने सांगताना दिसतात......

*पंढरपूरचा विठ्ठल हा तथागत बुद्ध आहे हे झालं संतांची गाथेतिल अभंगवाणीचे पुरावे.

आता आपण तथागत बुद्ध हा विठ्ठल आहे त्याचे प्रत्यक्ष पुरावे पाहुया......

महाराष्ट्रात शीळाप्रेसवर पंचाग नवग्र जात असे, या पंचागाच्या मुखपृष्ठावर नवग्रह व दश अवताराच्य चित्रात नवव्या अवताराच्या स्थानी विठ्ठलाचे चित्र छापत व त्या विठ्ठलाच्या खाली बुद् असे लिहिलेले असे......

विचारवंत डॉ. रा.चि.ढेरे दोन पुस्तकांचा ऊल्लेख करतात पहले पुस्तक श्री विठ्ठल एक महासमन्वय आणि दुसरे म्हणजे श्रीराम सहश्त्रनाम ह्या स्तोत्राच्या पुस्तकात गरुड, हनूमान विठ्ठलाचे चित्र छापलेले असून त्याच्या खाली बुद्ध असे लिहिले आहे

तसेच महाराष्ट्रात दोन मंदिर आहेत*

महाराष्ट्र - तासगांव - सांगली विंचूरकरांनी बांधलेले दक्षिणी शैलीचे गणेश मंदिराच्या गोपूरावर बुद्धाची मूर्ति आहे.

कोल्हापूर महालक्ष्मी मंदिराच्या ओवारित बुद्ध मूर्ती दगडावर कोरलेल्या आहेत.

संत नामदेव महाराजा पासून ते संत तुकाराम महाराजा पर्यंतच्या संताच्या वाणीतून आणि महाराष्ट्रातील लिखीत व कोरीव शिल्पातिल पुराव्यावरून सिद्ध होतं की पंढरपूरचा विठ्ठल तथागत बुद्धच आहेत

आज जरी इतिहासतज्ञ, वैचारिक अभ्यासकांना संत आणि बुद्ध यांच्यातलं विचारधारेचं नातं माहिती असलं तरी सामान्य वारकरी म्हणवणार्यांना हभप किर्तनकाराला बुद्धांविषयी प्रेम वाटत नाही.आपुलकी वाटत नाही. आदर वाटत नाही कारण वैदिकब्राह्मणी मनुवाद्यानी त्यांच्या मनात असं भरवलं आहे की बुद्ध आपला नाही, तो परका आहे, आपला बुद्धाशी काही संबंध नाही स्वतःला विठठलाचा वारकरी म्हणवणार्या हभप किर्तनकाराच्या डोक्यात जातीयवादी, विषमतावादी, माणसामाणसात भेद करणार्या वैदिकब्राह्मणी विचारांचीच पेरणी झालेली असल्यामुळे, त्यांच्या मनात जातीयवादी विचारांचं तण माजलेलं आहे डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या लक्षावधी अनुयायांसह बौद्ध धर्म स्विकारल्यामुळे तर या अल्पबुद्धि लोकांच्या मनात बौद्ध धम्म आणि तथागत बुद्ध यांच्याविषयी अधिकच दुरावा निर्माण झाला आहे कारण वैदिक ब्राह्मणांनी त्याला खतपाणी घातले आहे.

अशा परिस्थितीत या मूढ लोकांना आपल्या मूळ विचारांचं, धर्माचं भान आणून देण्यासाठी संत नामदेवा पासून ते संत तुकाराम महाराजांचा हे अभंग अतिशय महत्त्वाचा आहे.

आपली परंपरा स्वातंत्र्य, समता आणि बंधुतेची शिकवण देणारी परंपरा आहे. लोकांना शारीरिक, मानसिक, बौद्धिक गुलाम बनवणारी, उच्चनीचता पाळणारी, भेद पाळणारी, द्वेष पसरवणारी परंपरा आपली नाहीच ति वैदिक ब्राह्मणी मनुवादि परंपरा आहे तेव्हा......

( संदर्भ: - उल्हास पाटील, गाथा परिवार)

तुमचा गैरसमज दूर करा

तथागत भगवान बुद्ध हे केवळ १९५६ ला धर्मांतरीत झालेल्याच लोकांचीच विरासत नाही तर तथागत भगवान बुद्धांचे तुम्ही-आम्ही तमाम बहुजन समाज वारसदार आहात तुमच्या वारसाहक्काचे पुरावे यथा योग्य पध्दतीने तुमच्या समोर मांडण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. आशा आहे आणि विश्वास देखील आहे की ज्या दिवशी बहुजन समाजाला इतिहासिक सत्यतेचे जेव्हा भान येईल तेंव्हा संतविचारांच्या माध्यमातून तथागत भगवान बुद्धाचे विचार बहुजनां मध्ये रुजण्याला अनुकूल मनोभूमी तयार होईल. यासाठी वैचारिक मशागत करावी लागेल आणि ते केले तरच भविष्यात बहुजनांचा बहुजनसमाज निर्माण होऊ शकतो.....

# धर्मनिरपेक्षतेच्या रक्षणासाठी अल्पसंख्यांकांना राजकीय आरक्षण!

२०२४ च्या लोकसभा निवडणुकांचे सूप वाजून सरकार स्थापन झाले आहे. भारत देश हिंदुराष्ट्र होण्याचा धोका तात्पुरता टळला असला तरी यासाठी अजून जोरदार प्रयत्न संघ परिवाराकडून केले जातील यात शंका नाही. आरक्षण असलेल्या समूहांनी आणि अल्पसंख्यांकांनी भरभरून मतदान केल्यामुळेच हे शक्य झाले आहे. एक देश म्हणून जोपर्यंत देशातील अहिंदू लोकसंख्येचे (मुसलमानांचे) नक्की काय करायचे याचे खरे, प्रामाणिक, न्याय्य आणि शक्य उत्तर शोधत नाही तो पर्यंत आपण भारतीय गाय, गोमूत्र आणि गोबर याच्या बाहेर येऊ शकणार नाही. तोपर्यंत देशाची प्रगती शक्य नाही. हिंदुत्वाच्या (मुस्लिमद्वेषी) राजकारणातून जर आपसूक मते मिळत असतील तर विकासाचा कष्टप्रद मार्ग कोण कशाला शोधेल? समाजात सांस्कृतिक उतरंडीवर आपले स्थान वर असावे असे प्रत्येक समाजघटकाला वाटते. मर्यादित संसाधनांवर अग्रहक्क प्रस्थापित करून केवळ आर्थिक लाभासाठीची ही धडपड नसून सांस्कृतिक पुढारलेपण मिळवण्याचाही प्रयत्न असतो. हा संघर्ष हिंदू धर्मांतर्गत जातीजातींमध्ये चालतो तसाच हिंदू मुस्लिम असाही चालतो. आपल्याकडे धार्मिक संघर्ष जरा जास्तच तीव्र आहे. मानसिक आधार, चांगुलपणा आणि पारलौकीक समाधान यासाठी धर्म हे आदर्श असले तरी ते जुनाट, अपरिवर्तनीय आणि अनुयायांपुरते असतात. तरीही धर्मामध्ये ध्रुवीकरणाची ताकद असते. धार्मिक अस्मिता चेतवून, जनभावनेचे अपहरण करून बहुसंख्यांकांचा धार्मिक राष्ट्रवाद कुरवाळून लोकशाहीत जरी सत्ता मिळवता आली तरी धर्माच्या राजकारणामुळे माणुसकी, सहिष्णुता, प्रगतिकता आणि विवेकवादाची हानी होते. तरीही सत्तेच्या आसक्तीपुढे तत्वज्ञान गौण ठरते. आपल्या देशाला असलेल्या दीर्घ इतिहासातून सोईस्कर कथानके मांडून जनभावना मतपेटीत वळवता येतेच. इतिहासातील मुस्लिमधर्मीय आक्रमकांनी एतद्देशिय हिंदूंवर केलेले अत्याचार, मिळवलेले विजय, लूट, मंदिरांचा नाश, धर्मपरिवर्तन हे सगळी साधनसामुग्री आपल्याला वारशाने मिळालेलीच आहे. चार धर्मांचे जन्मस्थान, हजारो पंथ, जाती, श्रद्धा, कर्मकांड, भाषा, भौगोलिक परिस्थिती, राहणीमान, खानपान, संस्कृती आणि हवामान अशा अनेक वैविध्यपूर्ण गोष्टींनी आपला देश बनलेला आहे. जगातील १८ टक्के लोकसंख्या गेली ७५ वर्षे संविधानाने स्थापित कायद्याचे राज्य, कायदेमंडळ, न्यायपालिका आणि प्रशासन याच्या माध्यमातून राष्ट्र म्हणून उभी आहे. कल्याणकारी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही राज्यव्यवस्था देणारे संविधान हीच खरी भारत देशाची ओळख (आयडिया ऑफ इंडिया) आहे.संविधानामध्ये सुरुवातीपासूनच अध्याहृत असले तरी 'धर्मनिरपेक्ष'हा शब्द १९७६ मध्ये ४२ व्या घटनादुरुस्तीने घटनेच्या प्रास्ताविकेत समाविष्ट करण्यात आला. धर्मनिरपेक्षतेचा साधा, सोपा आणि सरळ अर्थ म्हणजे 'भारत हा धार्मिक देश नाही. राज्याला कोणताही धर्म नाही. सरकार स्वतःला सर्व आणि प्रत्येक धर्मापासून समान अंतरावर आणि दूर ठेवेल'. त्याच वेळी, नागरिकांना त्यांच्या आवडीच्या धर्माची निवड आणि त्यानुसार पालन करण्याचे निर्विवाद स्वातंत्र्य आणि तशा हक्काची हमी घटनेमध्ये आहेच. ही भूमिका पूर्णपणे प्रागतिक, न्याय्य आणि तार्किक आहे. अनेक वर्षे राजकारणाच्या आणि सत्तेच्या परिघाबाहेर राहिलेल्या हिंदू कट्टरतावादी रा. स्व. संघ आणि भाजपने, सत्ता मिळवण्यासाठी देवाधर्माचा वापर करण्याची निवडणूक पद्धती विकसित केली. सनातन परंपरा महान असल्याची छद्मभावना, बहुसंख्याकांचा राष्ट्रवाद आणि मुख्यत्वे करून मुस्लिम द्वेष यावर त्यांचे राजकारण आधारित आहे. म्हणूनच २०१४, २०१९ आणि २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपने एखादा जावई अपवाद वगळता एकाही मुस्लिम नागरिकाला उमेदवारी सुद्धा दिलेली नाही. यातून ते मुस्लिमद्वेष अधोरेखित करतात. हिंदू अस्मितेचे भांडवल करतात आणि ८० विरुद्ध २० ची भाषा करतात. अस्मितेच्या राजकारणाआड आर्थिक आणि प्रशासकीय अपयश लपवता येते आणि सत्ताही मिळते. या राजकारणच पाडाव कसा करायचा हा कळीचा प्रश्न आहे. देशातील सर्वोच्च कायदेमंडळ असलेल्या लोकसभेतील अल्पसंख्यांकांचे स्थान एकविसाव्या शतकात इतके कमी कसे, याचाही अन्वयार्थ लावला पाहिजे. आपल्या सामाजिक सद्भाव, सौहार्द आणि सहिष्णुतेच्या चेहर्‍यासमोरील हा आरसा असणार आहे. २०२४ च्या लोकसभेमध्ये ५४३ पैकी फक्त २४ खासदार मुस्लिम धर्मीय आहेत. म्हणजे सुमारे ४.४२ टक्के. अर्थात हे सगळे इंडिया आघाडीचे असून एनडीएचा एकही मुस्लिम खासदार लोकसभेत नाही. सुमारे १५ टक्के लोकसंख्येच्या प्रमाणात पाहता या आधीच्या लोकसभेतही मुस्लिम खासदारांची संख्या कमीच आहे. २०१९ मध्ये ४.७९ टक्के, २०१४ मध्ये ४.२४ टक्के, २००९ मध्ये ५.१६ टक्के, २००४ मध्ये ६.४५ टक्के. १९५२ ते २०२४ अशा १८ निवडणुकांत मुस्लिम खासदारांची सरासरी टक्केवारी ५.६५ टक्के एवढीच आहे. देशात किमान ८० (१५ टक्के) लोकसभा मतदारसंघांत मुस्लिम लोकसंख्या किमान २५ ते ५० टक्के म्हणजेच निवडणुकीवर प्रभाव टाकणारी आहे. तरीही संसद आणि विधानमंडळे यामध्येही मागील ७० वर्षात अल्पसंख्यांक २० % लोकसंख्येला केवळ ६.५० टक्के एवढेच प्रतिनिधित्व मिळालेले आहे. उच्च न्यायालयात बिगरहिंदूंना केवळ ४.३२ टक्के आणि सर्वोच्च न्यायालयात केवळ ६.४९ टक्के पदे इतकेच स्थान आहे. कार्यपालिकेमध्ये बिगर हिंदूंचे प्रमाण ९ टक्क्यांच्या खाली आहे. यातून हे स्पष्ट दिसते की अल्पसंख्यांकांना आपल्या देशात फारच कमी प्रतिनिधित्व मिळते. सर्वसमावेशक आणि संतुलित प्रगतीसाठी, मानवतापूर्ण आणि वैज्ञानिक देशनिर्माणासाठी अल्पसंख्यांकांना लोकसंख्येच्या प्रमाणात राजकीय आरक्षण मिळाले पाहिजे.सरकारी नोकऱ्या आणि शिक्षण संस्थांमधील आरक्षण हे सामाजिक आरक्षण आहे. तर निवडणुकीतील राखीव जागा हे राजकीय आरक्षण आहे.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांमध्ये कर्तुत्व असताना ही देशाचे पंतप्रधान का होऊ शकले नाही?

सध्या प्रसार माध्यमांवर एक व्हिडिओ क्लिप प्रसारीत झालेली पुष्कळ लोकांनी पाहिली असेल.त्यात बातमीदार माहिती देतांना सांगतो की,भारत स्वतंत्र झाला, तेव्हा स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू झाले.ते ह्या पदावर तब्बल १७ वर्षे होते. त्यावेळेच्या देशातील तीन महान नेत्यांपैकी एक पंतप्रधान झाले असते तर काय झाले असते ? ह्याची माहिती देतांना ते सांगतात की,तसे झाले असते तर आता निश्चित वेगळी परिस्थिती दिसली असती.ह्याची त्रोटक माहिती देताना ते पुढे सांगतात की,नेताजी सुभाषचंद्र बोस ह्यांचे चलो दिल्ली आंदोलन यशस्वी होऊन,ते भारतात परतले असते तर,ते भारताचे पंतप्रधान निश्चित झाले असते. तसे झाले असते तर,भारत आज कायद्याची तंतोतंत अंमलबजावणी करणारा देश म्हणुन गणला गेला असता. दुसरं नाव आहे भारताचे लोह पुरुष सरदार वल्लभ भाई पटेल.ते जर दहा वर्षे अधिक जगले असते तर निश्चितपणे पंतप्रधान झाले असते.जर असे झाले असते तर भारत देश जगातील मजबूत देश म्हणुन ओळखला गेला असता.ह्या यादीत तिसरे नाव असे आहे की,त्यांचा ह्या दृष्टीकोनातून कुणी विचारच केला नाही.ते नाव आहे युगपुरुष भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर.ते जर पंतप्रधान झाले असते तर देशाची दशा आणि दिशा ही बदललेली बघायला मिळाली असती.आताची राजकारणातील बजबजपुरी आणि कायद्याचे निघालेले धिंडवडे बघण्याची आणि ते मुकाट सहन करण्याची वेळ नागरिकांवर आली नसती.त्यांच्या भविष्यवेधी दूरदृष्टीचा विचार केल्यास असे दिसते की,ही परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी त्यांनी पूर्वीच कायमचा बंदोबस्त केला असता.

ह्यातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर जर पंतप्रधान झाले असते तर? ह्याचा थोडक्यात देखील विचार करण्यास वाव नाही.ह्याचे कारण असे आहे की,बाबा संविधान सभेत येण्यासाठी आग्रही होते. परंतु तो काळ जातीव्यवस्थेची कडक अंमलबजावणीचा तसेच सनातनी विचारांचा पगडा असलेला होता.त्यामुळे बाबांचा संविधान सभेत प्रवेश होऊ नये म्हणुन सगळ्या बाजूंनी अडथळे निर्माण केले.त्यामुळे ते थेट बंगाल मधून जोगेंद्रनाथ मंडल ह्यांच्या सहकार्याने निवडून आले.त्यामुळे ही मंडळी खट्टू झाली.परंतु जेव्हा भारताची फाळणी झाली तेव्हा त्यांना आयती संधी चालून आली. त्याचा फायदा घेत ह्यांनी बाबा निवडून आलेले चार जिल्हे नियम डावलून पाकिस्तानला दिल्यामुळे बाबांचे संविधान सभेतील सदस्यत्व आपोआप रद्द झाले. त्यामुळे बाबा हतबल झाले.त्यांनी व्हॉईसरॉयला पत्र लिहून संविधान सभेवर बहिष्कार घोषित केला. त्यांच्या कार्यकारी मंडळात बाबा मंत्री होते.त्यामुळे त्यांनी केलेले अभूतपूर्व काम लक्षात घेऊन त्यांनी बाबांना संविधान सभेत घेण्याची सुचना केली. त्यामुळे बॅरिस्टर जयकर ह्यांना राजीनामा देण्यास सांगण्यात आले आणि त्या जागेवर बाबांना निवडून आणले. हा सर्व इतिहास लक्षात घेता,त्यांना भारताचे पंतप्रधान करणे ही खुळी कल्पना आहे.

पण म्हणुन त्यांच्या कार्य कर्तुत्वाचा कसा विसर पडू शकतो?.माणूस एका जन्मात काय काय आणि किती नेत्रदीपक काम करू शकतो ह्याचे एकमेव ज्वलंत उदाहरण म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकर.ज्या व्यक्तीला जातिव्यवस्थेच्या उतरंडिमुळे वर्गाबाहेर बसुन शिक्षण घेणे भाग पडले.त्या व्यक्तीने प्रबळ इच्छाशक्तीच्या जोरावर अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत अर्धपोटी राहून अठरा अठरा तास अभ्यास केला.ज्याने आयुष्याचा प्रत्येक क्षण न क्षण विस्थापितांच्या प्रस्थापनेसाठी तसेच देशाच्या उभारणीसाठी कारणी लावला.परंतु दुर्दैवाने ते मागासवर्गीय असल्यामुळे त्यांच्या दैदीप्यमान कार्याची म्हणावी तशी दखल घेतली नाही.खर्या अर्थाने हे दुर्दैव त्यांचे नाही, तर ह्या देशाचे आहे.

बाबा त्यांच्या काळातील सर्वांत जास्त शिकलेले व्यक्तिमत्त्व होते.त्यांच्याकडे बत्तीस पदव्या आणि नऊ भाषांचे ज्ञान होते.ते कायदेतज्ज्ञ,प्राध्यापक,राजकारणी,अर्थतज्ज्ञ, समाजशास्त्रज्ञ,शिक्षणतज्ञ,इतिहास तज्ञ,लेखक,पत्रकार आणि संपादक असे विविधांगी व्यक्तिमत्त्व होते.त्यांच्या प्रखर बुद्धिमत्तेचा विचार केल्यास,त्यांनी लंडन स्कूल ऑफ ईकोनॉमिक्स मधील डि. एस.सी.ही आठ वर्षांचा कालावधी असलेली अत्यंत कठीण परीक्षा फक्त दोन वर्षे सहा महिन्याच्या अल्पावधीत यशस्वीपणे पूर्ण केली. आतापर्यंत भारतामध्ये ही परीक्षा उत्तीर्ण झालेल्या फक्त दोन व्यक्ति आहेत.त्या म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि माजी राष्ट्रपती के.आर.नारायणन. विशेष गोष्ट अशी आहे की,हे दोघेही मागासवर्गीय आहेत.

बाबांना बहिष्कृत वर्गाच्या उत्थानाची जेव्हढी चिंता होती, त्यापेक्षा अधिक ते प्रखर राष्ट्रभक्त होते.स्वातंत्र्याच्या पाऊणशे वर्षानंतर ह्याचे विश्लेषण करण्याचे दुर्दैव आपल्या वाट्याला येते. ह्यावरून त्यांना हेतुपुरस्सर दुर्लक्षित ठेवले. हे लक्षात येते.ज्या व्यक्तीने मी प्रथम भारतीय आणि अखेर ही भारतीयच असे जाहीरपणे सांगितले.त्यांच्या राष्ट्रभक्तीबद्धल शंका घेणे चुकीचे आहे असे मी कदापि म्हणणार नाही.कारण ते गावकुसा बाहेरील समाजामध्ये जन्मले असल्यामुळे,त्यांच्या अतुलनिय कामगिरीची प्रशंसा करणे.ही गोष्ट प्रस्थापित मानसिकतेला न पचणारी होती. आजच्या काळात देखील किती लोकांना हे माहीत आहे की,त्यांनी गोलमेज परिषदेत जेव्हढ्या पोटतिडिकीने बहिष्कृतांच्या समस्या मांडल्या,त्यापेक्षा अधिक पोटतिडिकीने आणि परखडपणे त्यांनी इंग्लंडचे पंतप्रधान आणि त्यांच्या मंत्रिमंडळाला ठणकावून सांगितले की, जसे कोणत्याही संप्रदायाला दबाव टाकून गुलाम बनवण्याचा अधिकार नाही. तसेच कोणत्याही देशाला दुसर्या देशावर आपली सत्ता गाजवून गुलाम ठेवण्याचा अधिकार नाही. म्हणुन ब्रिटीशांना भारत अजून स्वातंत्र्य प्राप्तीसाठी सक्षम नाही.असे म्हणण्याचा अधिकार नाही.बालकाला कडेवर घेऊन फिरल्याने,तो आपल्या पायावर कसा काय चालू शकेल? म्हणुन त्याला कडेवरून उतरवून स्वतंत्रपणे चालण्याचा अधिकार दिला पाहिजे.ज्यांची अर्ध्या जगावर महासत्ता होती,त्या इंग्लंडच्या सत्ताधीशांसमक्ष असे परखड बोलण्यासाठी वाघाचे काळीज लागते.आणि ते बाबांजवळ होते. ह्यावरून त्यांची राष्ट्रभक्ती दिसून येते.

जेव्हा दलितांना स्वतंत्र मतदारसंघाची घोषणा करण्यात आली. त्याविरोधात महात्मा गांधींनी आमरण उपोषण केले.तेव्हा त्यांना विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देतांना त्यांनी सांगितले की,गांधी की समाजहित यामध्ये मी गांधींच्या प्राणापेक्षा समाजहिताला प्राधान्य देईन.परंतु राष्ट्रहित की समाजहित यामध्ये मी राष्ट्र हिताला प्राधान्य देईल. त्यांच्या प्रॉब्लेम ऑफ रुपीज ह्या ग्रंथावर आधारित रिझर्व बँक ऑफ इंडियाची १९३५ सालात स्थापना झाली.ते मसुदा समितीचे अध्यक्ष असल्यामुळे त्यांच्याकडे जेव्हा संविधानात ३७० कलम समाविष्ट करण्याबाबत प्रस्ताव आला. तेव्हा त्याचे भविष्यात होणारे विपरीत परिणाम देशहित लक्षात घेऊन,ते संविधानात समाविष्ट करण्यास नकार दिला.नंतर ते मसुदा समितीचे सदस्य अय्यंगार ह्यांच्याकडून तयार करून मंजूर करून घेतले.त्यांचा भारत पाकिस्तान फाळणीला विरोध होता.त्याविषयी त्यांनी मोहम्मद अली जिना ह्यांच्याशी चर्चा देखील केली. परंतु ते फाळणीवर ठाम राहिले. बाबानी ह्याबाबतची भूमिका पाकिस्तान ऑर पार्टिशन ऑफ इंडिया हे पुस्तक लिहून त्याच्या पुढील काळात होणार्या परिणामांची मांडणी केली आहे.ह्या विषयाच्या अनुषंगाने विचार केल्यास त्यांच्या राष्ट्रीय पातळीवरील कामांचा आढावा घेणे उचित ठरेल.

ते व्हॉईसरॉयच्या कार्यकारी मंडळामध्ये १९४२ ते १९४६ पर्यंत होते.ह्या काळात ते मजूर,ऊर्जा,खनिज आणि जल नियोजन ह्या खात्याचे मंत्री होते. तसेच स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या मंत्रीमंडळात ते कायदा आणि न्याय खात्याचे मंत्री होते.ह्याचा अर्थ असा होतो की,१९४२ ते १९५१ असे तब्बल १० वर्षे त्यांनी देश पातळीवर काम केले आहे. देशातील हिंदु स्त्रियांच्या अधिकारांसाठी एक दलित अभ्यासपूर्ण बिल तयार करून लोकसभेत मांडतो.ही कल्पनाच सनातनी विचारांच्या समाजाच्या पचनी पडली नाही. म्हणुन त्याला प्रचंड विरोध झाल्यामुळे ते बिल स्थगित करण्यात आले. त्यामुळे बाबांनी नाराज होऊन तडकाफडकी मंत्री पदाचा राजीनामा दिला.गंमत अशी आहे की,पुढील काळात तेच बिल तीन वेगवेगळ्या नावांनी मंजूर करण्यात आले.

व्हॉईसरॉयच्या कार्यकारी मंडळातील मंत्रीपद भूषवताना जल नियोजन खात्याचा कार्यभार असतांना त्यांनी दूरदर्शी दृष्टीकोनातून अनेक योजना पूर्णत्वास नेल्या. पाण्याचा जास्तीत जास्त उपयोग करण्यासाठी धोरण निश्चित केले. त्यासाठी त्यांनी केंद्रीय तांत्रिक ऊर्जामंडळ स्थापन केले. त्यांनी दामोदर नदीवर धरण बांधण्यासाठी सर्वेक्षण केले.हा बहुउद्देशीय प्रकल्प असल्यामुळे सिंचन,वीज निर्मिती,आणि जलवाहतूक हे उद्देश समोर ठेऊन कामाला गती दिली.त्यांनी बंगाल व बिहार राज्यांच्या सहकार्याने हा प्रकल्प पूर्णत्वास नेला.

ओरीसा राज्यातील नद्यांच्या विकासासाठी तसेच पुरामुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी कायमस्वरूपी योजना आखली. त्यासाठी नद्यांचे सर्वेक्षण,पाणी साठविणे,धरणांची उभारणी,धरणामुळे शेतीला पाणी मिळून दुष्काळ पडणार नाही, वीजनिर्मितीमुळे कारखानदारी वाढून रोजगार निर्मिती होईल असे उपाय त्यांनी ओरीसा सरकारला सुचवले.त्यांच्या सहकार्याने महानदीचे सर्वेक्षण करून १५ मार्च १९४६ रोजी हिराकुड धरणाची पायाभरणी केली. त्यांनी हे काम पूर्णत्वास नेण्यासाठी ओरीसा सरकारला भक्कम पाठबळ देऊन नियोजन केले.ह्या नंतरच्या काळात त्यांनी मध्यप्रदेशातील सोननदी खोरे प्रकल्प हाती घेतला.त्याअगोदर त्यांनी आराखडा तयार करून घेतला.त्याच्या सर्वेक्षणात ह्या प्रकल्पाचे फायदे नमूद केले.त्यामुळे पुढील काळात धरण बांधण्याची प्रक्रिया सुलभ झाली.

त्याचप्रमाणे त्यांच्याकडे खनिज निर्मिती खातेही होते.त्यांनी औद्योगिकरणाला चालना दिल्याने खनिज निर्मिती संदर्भात धोरण निश्चित केल्यामुळे त्यात सुसूत्रता आली. त्यांनी भूगर्भशास्त्र सर्वेक्षणाला प्राधान्य देऊन अभियांत्रिक भूगर्भशास्त्र, खनिजांचा उद्योगात वापर,खनिज निर्मिती मुल्य त्याचप्रमाणे खाणकाम परवाने मंजूर करणे,परवान्याच्या अटी व शर्ती निश्चित करणे,परवाना रद्द करणे,खनिजांची निर्यात वाहतुक, कामगारांचे वेतन भत्ते,अपघात विमा,त्यांची सुरक्षितता,कोळशाचे उत्खनन तसेच त्याचे प्रकार या बाबींकडे लक्ष देऊन देशहिताचे निर्णय घेतले.

एकूणच विचार करता बाबांनी मिळालेल्या शासकीय अधिकारांच्या संधीचे दूरदर्शीपणे कष्टपूर्वक मेहनत घेऊन सोने केल्याचे दिसते. त्यांनी आर्थिक योजना राबवून कामगारांचे हित होईल ह्या दृष्टीकोनातून खूप काम केल्याचे दिसते.पाण्याचा दीर्घकाळ वापर होऊन शेतकर्यांसह सर्वांना उपयोग होईल ह्या दृष्टीकोनातून अनेक धरणे बांधण्यास चालना दिली.ऊर्जा विकासासाठी अनेक धोरणे राबवून मोठ्या प्रमाणात वीज निर्मिती केली.त्यांच्याच कार्यकाळात कामगार आयोग,जल आयोग,वीज आयोग नदी खोरे प्राधिकरण स्थापन करून देशाच्या प्रगतीच्या दृष्टीकोनातून कायमस्वरूपी योजना कार्यान्वित केल्या.आपला देश अर्थ,वीज,उद्योग,शेती,आणि पाणी या क्षेत्रांमध्ये स्वयंपूर्ण व्हावा म्हणुन अनेक धोरणे आखून विकासाचा पाया रचला. त्यांनी राबवलेल्या योजनांचा देशाला आतापर्यंत खूप फायदा झाला आहेच परंतु यापुढे ही त्यांचा निश्चित उपयोग होणार आहे.

मी हा लेख वर्तमानपत्रासाठी लिहित असल्यामुळे शब्दांची मर्यादा आहे.खरे पाहिल्यास बाबांनी देशाच्या प्रगती आणि समृद्धीसाठी केलेल्या योजनांची तपशीलवार आराखडा देण्याचा प्रयत्न केला तर एक मोठा ग्रंथ तयार होईल.इतके काम त्यांनी करून ठेवले आहे.म्हणुन त्यांनी राबवलेल्या कायम स्वरूपी योजनांचा आणि कायद्यांचा फक्त उल्लेख करतो.

भारतीय नागरिकांना मतदानाचा अधिकार,महिला संरक्षण कायदा,महिलांना घटस्फोटाचा अधिकार,प्रसूति रजा,पालकत्वाचा अधिकार,महिलांना मालमत्तेचा अधिकार,महिला कामगार संरक्षण कायदा,समान काम समान वेतन,भाक्रा नांगल धरण,मध्यवर्ती जल सिंचन आयोग,राज्य विभागणी आयोग,अर्थ व्यवस्थेची तरतूद, मध्यवर्ती विद्युत तांत्रिक समिती,तांत्रिक प्रशिक्षण योजना,भारतीय सांख्यकिक कायदा,भविष्य निर्वाह निधी,कामाचे तास १२ तासाहून ८ तास केले,महागाई भत्ता,कामगार संघटना मान्यता,कायदेशीर संपाचा अधिकार व प्राथमिक सेवा,आरोग्य विमा,कामगार राज्य विमा.ह्या व्यतिरिक्त संविधान निर्मितीच्या कामासाठी त्यांनी १९४६ ते १९५० च्या दरम्यान २ वर्षे,११ महिने आणि १८ दिवस रात्रंदिवस मेहनत घेऊन ते कार्य पूर्णत्वास नेले.बाबांच्या ह्या अतुलनीय कामगिरीचा आढावा घेतल्यानंतर वाचकांनी मनोमन प्रश्न विचारावा की,डॉ.बाबासाहेब आंबेडकर पंतप्रधान झाले असते तर? आणि त्याचे उत्तर शोधावे.

*******

जयभीम.

अरुण निकम.९३२३२४९४८७.
मुंबई.
दिनांक ०७/०७/२०२४.

# मराठा आरक्षण जनजागृती व शांतता रॅली निम्मीत्त वाहतूक मार्गात बदल

लातुर शहरात दिनांक ०९/०७/२०२४ संघर्ष योध्दा श्री मनोज जरांगे पाटील यांचे उपस्थितीत अखंड मराठा समाज जिल्हा लातूर यांच्या वतीने मराठा आरक्षण जनजाग्रती व शांतता रॅलीचे दिनांक ०९/०७/२०२४ रोजी आयोजन केले असून लातूर शहरात मोठया प्रमाणात जनसमुदाय जमा होऊन छत्रपती राजर्षी शाहु महाराज चौक येथून मराठा आरक्षण व शांतता रॅलीची सुरूवात करून अण्णाभाऊ साठे चौक – महात्मा गांधी चौक – महात्मा जोतीबा फुले उद्यान – टाऊन हॉल ते छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे काढण्यात येणार असून रॅलीत मोठ्या संख्येने जनसमुदाय एकत्र येऊन विविध ठिकाणी महापुरूषांचे पुतळ्यास मानवंदना करणार आहेत. त्यावेळी रस्त्याच्या दुतर्फा गर्दी होण्याची शक्यता आहे त्यामुळे जनतेच्या सोयीच्या व सुरक्षेच्या दृष्टीने लातूर शहरातील खालील मार्गावर वाहतुक बंद करणे व वळविणे आवश्यक आहे. दि. ०९/०७/२०२४ रोजी मराठा आरक्षण जनजाग्रती व शांतता रॅली छत्रपती राजर्षी शाहु महाराज चौक – अण्णाभाऊ साठे चौक – महात्मा गांधी चौक – महात्मा जोतीबा फुले उद्यान – टाऊन हॉल ते छत्रपती शिवाजी महाराज चौक हे सर्व मार्ग सकाळी ९.०० ते १७.०० वाजेयर्पंत सर्व प्रकारच्या वाहनांना (एस.टी.बसेस, ट्रक, टेम्पो, टॅक्सी, ट्रॅव्हल्स व मिनिडोर, कार, मोटरसायकल इत्यादी) वाहतुकीसाठी बंद करण्यात येत आहे. तरी जनतेने खालील पर्यायी मार्गाचा अवलंब करावा

१) पीव्हीआर चौकातुन शिवाजी चौक व शहरात येणारे एस.टी.बसेस, पीव्हीआर चौकातुन रिंगरोड ने नविन रेणापूर नाका मार्ग जुना रेणापुर नाका येथील बसस्टँन्ड चा वापर करतील बाकी सर्व वाहणे रेणापुर नाका कडे किंवा खाडगाव टी पॉईन्ट मार्गे वाडा हॉटेल किंवा खाडगाव टी पॉईन्ट साईधाम आशियाना बंगला , जुना औसारोड याचा वापरकरतील.

२) औसारोड ने शहरात येणा–या एस.टी.बसेस वाडा हॉटेल पीव्हीआर चौक नविन रेणापुर नाका या रिंगरोड मार्गे जुना रेणापूरनाका येथील बसस्थानकाचा वापर करतील. तसेच चारचाकी, तीन चाकी,व दोन चाकी वाहने जुना औसारोड वरून आशियाना बंगला , साई धाम मार्गे खाडगाव टी पॉईन्ट किंवा नाईक चौक मार्गे जनज्योती महात्मा बसवेश्वर चौक रिंगरोड या मार्गाचा वापर करतील.

३) अंबेजोगाई रोडने लातूर शहरात येणा–या एस.टी.बसेस जुनारेणापूर नाका येथील बसस्थानकाचा वापर करतील. अंबेजोगाई रोडने येणारी तसेच चारचाकी, तीन चाकी,व दोन चाकी वाहने हे सिध्देश्वर मंदीराकडील रिगरोड मार्गे गरूड चौक किंवा गावभागात जातील.व तसेच जुना रेणापुर नाका येथून बालाजी मंदीर जाणा–या मार्गाच वापर करतील.

४) नांदेडरोडने शहरात येणा–या एस.टी.बसेस या गरूड चौक ,सिध्देश्वरचौक , नविन रेणापूर रेणापूरनाका मार्गे जुने रेणापूर नाका येथील बसस्थानकाचा वापर करतील. नांदेडरोडने शहरात येणा–या चारचाकी, तीन चाकी,व दोन चाकी वाहने सिध्देश्वररोड मंदीरकडील रिंगरोडने नविन रेणापूर नाका रेल्वे स्टेशन ,पीव्हीआर चौक या मार्गाचा वापर करतील किंवा गरूड चौक ,बाभळगावनाका बसवेश्वरचौक मार्गे राजीव गांधीचौक या मार्गाचा वापर करतील.

५) तसेच शहरातील वाहतुकीसाठी जनतेस (१) राजस्थान विद्यालयाच्या पॅरलल रोडने बेद्रे कॉम्प्लॅसच्या पाठीमागील औसारोड , आशियाना बंगला ,खाडगावरोड ते रिंगरोडचा वापर करतील.जुना रेणापुर नाका बसस्थानक येथे येणा–या व जाणा–या सर्व बसेस परत त्याच मार्गाचा/ रिंगरोडचा वापर करतील/जातील.

६) स्वामी विवेकानंद चौक – राजश्री शाहु महाराज चौक – अण्णाभाऊ साठे चौक – गंजगोलाई हनुमान चौक– महात्मा गांधीचौक – मिनी मार्केट –आशोक हाटेल ते छत्रपती शिवाजी महाराज चौक हा मार्ग दिलेल्या वरील वेळेत सर्व प्रकारच्या वाहनांना वाहतुकीसाठी बंद राहील.

तरी सर्व नागरिकांनी दि.०९/०७/२०२४ रोजी सकाळी ०९.०० ते १७.०० वाजेपर्यंत वाहतुकीसाठी बंद असलेल्या मार्गावर वाहनांचा वापर टाळावा व पर्यायी मार्गाचा वापर करुन प्रशासनास सहकार्य करावे.

# एसआयपीत सतत बदल नुकसानकारक

गुंतवणूकदारांनी आपल्या एसआयपीत एका फंडमधून दुसर्या फंडमध्ये सतत जाण्याचा किंवा बदल करण्याचा मोह टाळला पाहिजे. यास 'रिव्हर्सन टू मीन' संकल्पना कारणीभूत आहे, त्यामुळे दीर्घकाळापासून करण्यात येणार्या गुंतवणुकीवरच्या चांगल्या परताव्यावर पाणी पडू शकते. 'असोसिएशन ऑफ म्युच्युअल फंड्स इन इंडिया'च्या आकडेवारीनुसार, मे २०२४ मध्ये सिस्टेमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन बंद होण्याचे प्रमाण ०.८८ टक्के या विक्रमी पातळीवर पोचले. हा आकडा सामान्य सरासरी ०.५१ टक्क्याच्या तुलनेत अधिक आहे. हे प्रमाण एखाद्या महिन्यात सुरू होणारे एसआयपी किती प्रमाणात बंद झाले, हे सांगते.

निवडणूक निकालातील अनिश्चितता एसआयपी बंद करण्याचे प्रमाण अनेक कारणांनी वाढले. निवडणूक निकालावरून अनिश्चितता वाटू लागल्याने बाजारात चढउतार राहिला. अनेक गुंतवणूकदारांनी नफेखोरी केली कारण मिडकॅप आणि स्मॉलकॅपच्या शेअरचे मूल्य बरेच वाढले होते. केवायसी प्रक्रियेतील अडथळे हेदेखील एसआयपी बंद होण्याचे महत्त्वाचे कारण मानले जात आहे. ज्या गुंतवणूकदारांनी आधारशिवाय केवायसी केलेली होती, त्यांना पुन्हा एकदा या प्रक्रियेतून जावे लागले. काही फंडांनी खराब कामगिरी केल्याने आणि आर्थिक ध्येयात बदल झाल्याने नव्याने फंड खरेदी करणे, उत्पन्नात घट किंवा खर्चात वाढ यांसारख्या कारणांमुळेही एसआयपी बंद करण्याचा ट्रेंड राहिला.

एसआयपी थांबविणे एखादा फंड समाधानकारक परतावा देत नसेल, तर ते एसआयपी बंद करण्याचे प्रमुख कारण राहू शकते; परंतु फंडच्या कामगिरीचे आकलन करताना आपली रणनीती ही तात्पुरत्या रूपात अनुकूल आहे की नाही किंवा फंडमध्येच काही उणिवा आहेत, हे पाहिले पाहिजे. फंडमध्येच उणिवा असतील, तर त्या दूर करायला हव्यात. अन्य कारण म्हणजे फंडचे भवितव्य किंवा जोखीम उचलण्याच्या त्याच्या प्रोफाईलमध्ये होणारा बदल होय. कदाचित या बदलामुळे फंड हा गुंतवणूकदारांच्या पोर्टफोलिओत फिट बसत नसेल. याशिवाय गुंतवणूकदारांची जोखीम उचलण्याच्या क्षमतेत बदल झालेला असेल तरीही फंडच्या उपयुक्ततेवर परिणाम होऊ शकतो. जर उत्पन्नात घट किंवा खर्चात अचानक वाढ होत असेल, तर गुंतवणूकदारांना व्यक्तिगत आर्थिक आव्हानांच्या कारणांमुळे त्यांच्यासाठी वेगळी रक्कम सतत बाजूला काढून ठेवणे कठीण राहू शकते. एसआयपीशी संबंधित आर्थिक ध्येय गाठले असेल, तर त्याला थांबवता येणे शक्य आहे. सेवानिवृत्ती, जागेत बदल, आर्थिक मालमत्तेतून भौतिक मालमत्तेकडे जाणे अन्य कारणदेखील राहू शकते.

# कोरफड आणि आरोग्य



कोरफडीमध्ये अनेक औषधी गुणधर्म आहेत. मात्र, आपल्यापैकी अनेकांना कोरफडीमधील या गुणधर्माची माहिती नसते. कोरफडीच्या पानांचे टोक तीक्ष्ण असते. या पानांमध्ये कोरफडीचा गर असतो. कोरफडांच्या पानांमध्ये पाण्याचे प्रमाण भरपूर असते. त्यामुळे वर्षांनुवर्षे हे झाड तगून राहाते. कोरफडीचा वापर अनेक व्याधींमध्ये, आजारांमध्ये, दुखण्यांमध्ये करता येतो. शरीरावर असलेल्या भाजल्याच्या खुणा नष्ट करण्यासाठी कोरफडीचा वापर केला जातो. याचबरोबर त्वचेचे अनेक आजार दूर करण्यात कोरफड उपयुक्त ठरते.

केसांच्या आरोग्याकरिता कोरफडीचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. कोरफडीचा गर केसांना नियमित लावल्यास कोंडा दूर होतो. पोटाच्या तक्रारी दूर करण्यासाठीही कोरफड उपयुक्त ठरते. त्याकरिता कोरफडीचा ताजा गर घेतला पाहिजे.

चेहऱ्यावर आलेली सूज दूर करण्याकरता कोरफडीचा वापर केला जातो. बद्धकोष्ठतेचा त्रास आहे, अशांकरिता कोरफड हा प्रभावी उपचार समजला जातो. कोरफडींच्या पानांचा रस अनेक आजारांवर उपयुक्त ठरतो. कोरफडीमुळे शरीरातील ॲसिडिटी कमी होते. फ्लूचा व्हायरस नष्ट करण्याकरिता ही कोरफडीचा रस प्रभावी औषध म्हणून काम करतो.शरीरात वेगवेगळ्या कारणांमुळे निर्माण होणारी विषद्रवे (टॉसिन्स) नष्ट करण्याकरिता कोरफड प्रभावी ठरते. यासाठी सकाळी उठल्या उठल्या रिकाम्या पोटी कोरफडीचा गर खावा. अलीकडे बाजारात कोरफडीचा रस तयार स्वरूपात मिळू लागला आहे. शरीरातील उष्णता शोषून घेण्याचे कामही कोरफडीच्या रसाद्वारे केले जाते. बाजारात मिळणाऱ्या रसापेक्षा रोज कोरफडीचे ताजे पान घेऊन त्याचा गर काढून, त्याचे सेवन करणे अधिक फायदेशीर ठरते.

# दक्षता : म्युच्युअल फंडमधील गुंतवणूक सुरक्षित राहण्यासाठी...

तुम्हाला कोणत्याही गुंतवणुकीतून चांगला परतावा हवा असेल, तर तुम्ही गुंतवणुकीच्या सुरक्षिततेचाही विचार केला पाहिजे. हीच गोष्ट म्युच्युअल फंडांनाही लागू होते. आजकाल विविध प्रकारच्या आर्थिक फसवणुकीच्या घटना घडत आहेत. अशा स्थितीत गुंतवणुकीबाबत अधिक सावध राहावे लागेल. म्युच्युअल फंड गुंतवणुकीच्या सुरक्षेसाठी, कॅम्सने काही महत्त्वाच्या गोष्टी सांगितल्या आहेत. त्या म्युच्युअल फंडमधील गुंतवणूक सुरक्षित ठेवण्यासाठी उपयुक्त ठरतील. तुमचा वैयक्तिक मोबाईल नंबर आणि ई–मेल आयडी तुमच्या पोर्टफोलिओमध्ये नोंदणीकृत असल्याची खात्री करा. तुमच्या पोर्टफोलिओमधील कोणत्याही व्यवहाराविषयीची माहिती किंवा सूचना नोंदणीकृत मोबाईल–ई–मेल आयडीवर येत आहेत ना, याची खातरजमा करा. म्युच्युअल फंड/आरटीएकडून प्राप्त झालेल्या संप्रेषणांचे/सूचनांचे पुनरावलोकन करा. त्यामध्ये कोणतेही अनधिकृत व्यवहार अथवा बदल झाले असल्यास तत्काळ त्याबाबत रिपोर्ट नोंदवा. तुमचा ऑनलाईन ट्रान्झॅक्शन पासवर्ड, पिन आणि ओटीपी कोणालाही शेअर करू नका. विश्वासू वितरक आणि अधिकृत कर्मचारी यांच्याशिवाय इतर कोणालाही स्वाक्षरी केलेली कागदपत्रे देऊ नका. तुमची स्वाक्षरी केलेल्या रिक्त विनंत्या देऊ नका. व्यवहार केल्यानंतर पावतीचा आग्रह धरा. बँकेच्या आदेशात बदल केवळ तुमच्या विनंतीवर आधारभूत कागदपत्रांसह केले जातात. तुमच्या बँकेच्या आदेशाचा पुरावा म्हणून तुम्ही देत असलेला चेक रद्द केल्याची खात्री करा. तुमचा गुंतवणुकीचा चेक/डीडी फक्त म्युच्युअल फंडच्या किंवा त्या योजनेच्या नावेच द्या. चेक जारी करताना, चेकच्या मागील बाजूस पोर्टफोलिओ क्रमांक/अर्ज क्रमांक आणि निधीचे नाव लिहिणे श्रेयस्कर ठरते. गुंतवणुकीच्या वेळी नामांकन न विसरता द्या.स्वयं–साक्षांकित कागदोपत्री पुरावा प्रदान करताना आवश्यक वाटल्यास, सबमिशनचे कारण स्पष्ट करा.इलेक्ट्रॉनिक पेमेंट करण्यासाठी आरटीजीएस किंवा आयएफएससी कोडसह संपूर्ण माहिती द्या. एखादी व्यक्ती तुम्हाला कमिशन, प्रोत्साहन, भेटवस्तू इ. देत आहे म्हणून एखाद्या योजनेत गुंतवणूक करणे टाळा.महिन्यातून एकदा एकत्रित खाते स्टेटमेंटचा आग्रह धरा.संबंधित म्युच्युअल फंडाकडून खात्यांचे तपशील प्राप्त झाल्यानंतर डेटा कॅप्चरची शुद्धता तपासा. विसंगती (असल्यास) नोंदवा आणि ते त्वरित दुरुस्त करा.

# डॉ. आंबेडकर प्राथमिक आश्रमशाळा परस्पर हस्तांतर केल्याप्रकरणी वडेट्टीवार व चव्हाण यांच्याविरुद्ध अवमान याचिका दाखल करणार : अशोक कांबळे

लातूर : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मेमोरियल ट्रस्ट लातूरच्या वतीने लातूर तालुक्यातील कोळपा तांडा येथे चालविण्यात येत असलेली डॉ. आंबेडकर प्राथमिक आश्रमशाळा परस्पर हस्तांतर केल्याप्रकरणी महाविकास आघाडी सरकारमधील तत्कालीन मंत्री विजय वडेट्टीवार व नेक्स्टजेन फाऊंडेशनचे सचिव शेषेराव चव्हाण यांच्या विरोधात न्यायालयात अवमान याचिका दाखल करणार असल्याची माहिती डॉ. बाबासाहेब आंबेडकर मेमोरियल ट्रस्टचे अध्यक्ष अशोक कांबळे यांनी लातुरात पत्रकार परिषदेत बोलताना दिली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मेमोरियल ट्रस्टचे दिवंगत माजी आमदार टी.एम. कांबळे हे संस्थापक अध्यक्ष आणि मी स्वतः संस्थापक सचिव होतो. या संस्थेच्यावतीने गेल्या ३० वर्षांपूर्वी शासनाने कोळपा तांडा येथे विजाभज ची डॉ. आंबेडकर प्राथमिक आश्रमशाळा सुरु केली होती. इयत्ता पहिले ते सातवी पर्यंत ही शाळा चालवली जात आहे . काही कारणामुळे आमच्यात अंतर्गत मतभेद झाले. या मतभेदातून संस्थेचेही काही बाबतीत नुकसान झाले. मात्र, आमच्यातील अंतर्गत मतभेदाचा फायदा घेऊन नेक्स्टजेन फाऊंडेशनचे सचिव शेषेराव चव्हाण यांनी तत्कालीन महाविकास आघाडी सरकारमधील इतर मागास व बहुजन कल्याण खात्याचे मंत्री विजय वडेट्टीवार यांना हाताशी धरून ही आश्रमशाळा वर्ष २०२२ -२३ मध्ये आम्हालाच नव्हे तर लातूरच्या समाज कल्याण विभागालाही अंधारात ठेवून, शासनाला खोटी माहिती देऊन परस्पर हडपण्याचा कुटील डाव केला. आमच्या या शाळेसोबतच चव्हाण यांनी शासनाला चुकीची माहिती देऊन लातूर जिल्ह्यातील रेणापूर व चाकूर तालुक्यातील दोन आश्रमशाळा मिळवल्याचे सांगून या शाळांच्या गैर व्यवहाराचीही चौकशी होणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. शेषेराव चव्हाण याना आमची आश्रमशाळा परत देण्याची मागणी केली असता, त्यांनी याकामी माझे २५ लाख रुपये खर्च झाले आहेत. ते पैसे मला द्या आणि तुमची शाळा परत घ्या असे सांगितले. यावरून या शाळेच्या हस्तांतरादरम्यान मोठा आर्थिक व्यवहार झाला असल्याचे निदर्शनास येते,असेही कांबळे यांनी सांगितले. त्याचप्रमाणे चव्हाण यांच्या काटगाव येथील साने गुरुजी आश्रमशाळेत एका दलित मुलीवर लैंगिक अत्याचार करून खून करण्यात




आला होता. त्याप्रकरणी चव्हाण यांच्यावर गुन्हे दाखल झाले होते. त्याकाळात फरार असताना व शाळा चालू नसतानाही त्यांनी समाज कल्याण खात्याकडून लाखोंची बिले उचलून शासनाची फसवणूक केली आहे. त्याचीही चौकशी करण्याची मागणी अशोक कांबळे यांनी केली . या कुटील डावात चव्हाण यांनी मंत्रालयीन तसेच प्रशासकीय पातळीवरील अधिकाऱ्यांचीही दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. मात्र, चव्हाण यांच्या या कृतीबद्दल प्रशासनातील अधिकाऱ्यांना शंका आल्याने त्यांनी या आश्रमशाळेबाबत विजय वडेट्टीवार यांनी दि. १७ मार्च २०२२ रोजी काढलेल्या आदेशाप्रमाणे कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. या प्रकरणी अधिकारी वर्गाकडून कोणतीही कारवाई केली गेली नसली तरी वडेट्टीवार यांनी केलेली ऑर्डर कायम असल्यामुळे या आदेशाविरुद्ध आपण या खात्याचे विद्यमान मंत्री अतुल सावे यांच्याकडे ही चुकीची ऑर्डर रद्द करण्यात यावी, या मागणीचे अपील केले आहे. तसेच चुकीच्या पद्धतीने आश्रमशाळा हडप करण्याचा प्रयत्न करणाऱ्या शेषेराव धावाजी चव्हाण रा. काटगाव तांडा, ता. लातूर यांच्यावर फसवणुकीचा गुन्हा दाखल करून त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात यावी अशी मागणी पोलीस प्रशासनाकडे केल्याचे अशोक कांबळे यांनी सांगितले.

## कामगार नेत्याकडून वर्धा लोकसभेचे लोकप्रिय खासदार अमरभाऊ काळे यांचा शाल व पुष्पुच्छ देऊन केला सत्कार.

वर्धा / प्रतिनिधी :- कामगार नेत्याकडून वर्धा लोकसभेचे लोकप्रिय खासदार अमरभाऊ काळे यांचा शाल व पुष्पुच्छ देऊन केला सत्कार.



संघटीत असंघटीत कामगारांच्या न्याय हक्क अधिकार मिळवुन देण्यासाठी लढणारी क्रांतिकारी आंबेडकरी विचारांची राष्ट्रीय पातळीवरील ट्रेड युनियन स्वतंत्र मजदुर युनियन राष्ट्रीय अध्यक्ष जे एस पाटील यांच्या ध्येयवादी त्यागी नेतृत्त्वाखाली काम करणाऱ्या स्वतंत्र समता शिक्षक संघाचे राज्य अध्यक्ष सुनिल तेलतुंबडे यांनी कामगारांच्या समस्या सोडविण्यासाठी वर्धा लोकसभेचे लोकप्रिय खासदार अमरभाऊ काळे यांची भेट घेऊन त्यांच्याशी सविस्तर चर्चा केली.या भेटी दरम्यान नगर पालिकेच्या कामगारांचे प्रश्न सोडिण्यासाठी मी कटिबध्द असल्याचे खासदार अमरभाऊ काळे यांनी सांगीतले. यावेळी स्वतंत्र म्युनिसिपल कंत्राटी कामगार युनियन च्या माध्यमातून खासदार अमरभाऊ काळे यांचा सुनिलजी तेलतुंबडे (राज्य अध्यक्ष स्वतंत्र समता शिक्षक संघ तथा कामगार नेते) यांच्या हस्ते शाल पुष्पांगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. या वेळी कामगार प्रतिनिधी उपस्थिती होते.

# पाणी निचऱ्याकरिता लातूर शहर पूर्व भाग कृती समितीने लावले मुख्य रस्त्यावर बेशर्माचे झाड.

### समितीने मनपाचा जाहीर निषेध करीत तीव्र आंदोलन छेडण्याच्या दिला इशारा.

लातूर : येथील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौकातील मुख्य रस्त्यावर गेली ५ वर्षापासुन प्रत्यक पावसाळ्यात पाणी साचून या रस्त्यावर जलाशया सदृश्य परिस्थिती निर्माण होत असून नेहमी पाणी साचून रोडवर खड्डे पडले असल्याने पाण्यात खड्याचा अंदाज येत नसल्याने रोज अपघात घडत असताना पहायला दिसून येतात या मार्गावर रहदारी करणाऱ्या शाळेतील विद्यार्थी, पालक भगिनी, नागरिकांसह वाहन चालकांना येथून ये जा करण्यासाठी कसरत करावी लागत असून डेंगू सारख्या सदृश रोगांचे प्रमाण वाढण्याची शक्यता व रोगराई पसरण्याची भीती नागरिकात निर्माण झाली आहे. आंबेडकर चौकातील नागरिकांना रोडवर साचलेल्या घान पाण्यापासून येणाऱ्या समस्यांकडे महानगरपालिका लातूर यांचे लक्ष वेधून घेण्याकरिता लातूर शहर पूर्व भाग नागरी कृती समितीच्या वतीने वेळोवेळी अनेक आंदोलने, निवेदने देऊनही लातूर शहर महानगरपालिकेकडून दुर्लक्ष केले जात असल्याने आज समितीच्या वतीने या मार्गावर बेशर्माच्या झाडाचे वृक्षारोपण करून मनपाला जागे करण्यासाठी आमच्या मागण्या मान्य करा नाहीतर खुर्च्या खाली करा असा नारा देत याप्रसंगी महानगरपालिका कारभाराचा जाहीर निषेध व्यक्त करण्यात आला. यावेळी लातूर शहर महानगरपालिके कडून विकास कामात नेहमी लातूर शहर पूर्व भागावर अन्याय केला



जात असल्याचा गंभीर आरोप समिती कडून करण्यात येऊन महानगरपालिकेने डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातील नांदेड रोडवरील सखल भागात पावसाळ्यात साचत असलेल्या पाणी निचऱ्याकरिता तात्काळ उपाय योजना राबविण्यात याव्यात, अन्यथा येणाऱ्या पुढील काळात लोकशाही मार्गाने याहीपेक्षा आणखी तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा लातूर शहर पूर्व भाग नागरी कृती समितीचे अध्यक्ष दीपक गंगणे, सचिव बाबासाहेब बनसोडे, पत्रकार नितीन चालक, डॉ. संजय जमदाडे, शंकर जाधव, बाळासाहेब कटके,भगवेश्वर धनगर,कमलाकर कांबळे,सुधीर चंबूले,गौतम ससाणे,मुकूंद बनसोडे,जीवन कांबळे,लहू कांबळे, रवी कांबळे,विक्रम गायकवाड, दत्ता सूर्यवंशी, करीम गायकवाड, भीमा सुर्यवंशी, श्रीनंद गायकवाड, प्रा राजहंस धसवाडीकर,कोंडीबा पडोळे,लहू कांबळे, आदींच्या वतीने दिला आहे.

# बोनसारी गांव येथे मोफत नेत्र तपासणी शिबिर व चष्मा वाटप

नवी मुंबई / के. एच. हनवते :- दिनांक : ०५/०७ /२०२४ रोजी तुर्भे एमआयडीसी मधील बोनसारी गांव येथील नालंदा बुद्ध विहारा मध्ये भारतीय बौद्ध महासभा, वंचित बहुजन आघाडी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर नालंदा बुद्ध विहार संस्था यांच्या वतीने आणी लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट पनवेल यांच्या सहकार्याने व सामाजिक कार्यकर्ते दिपक गायकवाड व सुभाष बलखंडे याच्या पुढाकाराने मोफत नेत्र तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते या वेळी बोनसारी गावातील शेकडो नागरिकांनी तसेच कामगार वर्ग व विद्यार्थ्यांनी लाभ घेतला या वेळी अनेक नागरिकांना मोफत चश्मे वाटप करण्यात आले तर अनेकांना मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. या वेळी लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट च्या वतीने मा. गणेश अहीरे व नेत्र चिकित्सीत म्हणून पुजा बोडके, कविता करबेले, प्रथमेश ओंकार यांनी शिबिरातील लाभार्थींना मार्गदर्शन केले नेत्र तपासणी शिबिर उत्कृष्ट रितीने पार पाडण्यासाठी संस्थेच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते दिपक गायकवाड याच्या सह खिराजी धापसे, दिनकर सोनावणे, बंडु आवचरमल, अजिंक्य सोनावणे यांनी विशेष परिश्रम घेऊन शिबिर संपन्न केले



# महाराष्ट्र राज्य स्वतंत्र विद्युत कंत्राटी कामगार संघटना,वाशी झोन आढावा बैठक संपन्न.





खारघर / प्रतिनिधी : - दिनांक.०६ जुलै रोजी सायंकाळी ०४:०० वाजता महाराष्ट्र राज्य स्वतंत्र विद्युत कंत्राटी कामगार संघटनेची वाशी झोन आढावा बैठक मा.जे.एस.पाटील साहेब,अध्यक्ष स्वतंत्र मजदूर युनियन यांचे अध्यक्षतेखाली व मा.शैलेश आडे साहेब उपाध्यक्ष म.रा.मा.वि.का.सं. यांच्या प्रमुख उपस्थित युवा सेंटर,खारघर,मुंबई येथे संपन्न झाली. याआढावा बैठकीमध्ये सर्वप्रथम कंत्राटी कामगारांच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली तसेच कंत्राटी कामगाराना संघटनेचे ध्येय व धोरणे समजावून कायदेशीर तरतुदी व संरक्षण असूनसुद्धा त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी व समस्या सोडवण्याकरिता उपाययोजना करण्याकरिता उपस्थित मान्यवरातर्फे योग्य मार्गदर्शन करण्यात आले.सदर सभेमध्ये वाशी,ठाणे मंडळाकरिता नवीन कार्यकारणीची निवड करण्यात आली.सभेमध्ये नेरूर,पनवेल अर्बन व वाशी विभाग येथील कार्यरत बाह्यस्रोत वीज कंत्राटी कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुलींना मोफत शिक्षणाचा शासन आदेश लागू, जाणून घ्या नियम व अटी

मुंबई, : मुलींना व्यावसायिक शिक्षण मोफत देण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात आली आहे. राज्यातील शासकीय महाविद्यालये, शासन अनुदानित अशासकीय महाविद्यालये, अंशतः अनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये / तंत्रनिकेतने / सार्वजनिक विद्यापीठे, शासकीय अभिमत विद्यापीठे (खाजगी अभिमत विद्यापीठे / स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे वगळून) व सार्वजनिक विद्यापीठांतर्गत येणाऱ्या उपकेंद्रामधील मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमांस प्रवेश घेणाऱ्या मुलींना शिक्षण आणि परीक्षा शुल्कात १०० टक्के सूट देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला. त्यानंतर या निर्णयाच्या अंमलाबाजावणीचा अध्यादेश प्रसिद्ध केला आहे. शासनाच्या सीईटी सेल आणि तत्सम संस्थातर्फे राबविल्या जाणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (व्यवस्थापन कोट्यातील व संस्थास्तरावरील प्रवेश वगळून) प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी, ज्या मुलींच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ८ लाख रुपये किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील, इतर मागास प्रवर्गातील, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील नवीन प्रवेशित तसेच पूर्वीपासून प्रवेशित असलेल्या (अर्जाचे नुतनीकरण केलेल्या) मुलींना हा लाभ मिळणार आहे.उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण आणि औषधी द्रव्ये विभाग, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास आणि मत्स्यव्यवसाय विभाग व इतर मागास बहुजन कल्याण विभाग या विभागांकडून सध्या देण्यात येणाऱ्या शिक्षण शुल्क आणि परीक्षा शुल्काच्या ५० टक्के लाभा ऐवजी १०० टक्के लाभ देण्यास शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून शासन मान्यता देण्यात आली आहे.मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केली होती घोषणा...राज्यातील सर्व जाती-धर्माच्या मुलींना मोफत उच्च शिक्षण देण्यात येणार असल्याची घोषणा उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केली होती. जून २०२४ पासून या निर्णयाची अंमलबजावणी होईल असे त्यांनी यापूर्वी जाहीर केले होते. जवळपास ८०० अभ्यासक्रमांसाठी ही सवलत लागू राहणार असल्याचे त्यांनी सांगितले होते.मंत्री पाटील म्हणाले होते की, राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे स्वत: संवेदनशील असल्याने परभणीतील विद्यार्थिनीच्या आत्महत्येनंतर त्यांनी मुलींच्या शुल्कमाफीविषयी चर्चा केली होती. त्या अनुषंगाने हा निर्णय घेण्यात आला.

# मुख्यमंत्री वयोश्री योजनेमुळे ज्येष्ठांना मिळणार आधार ! जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घेण्याचे आवाहन

लातूर, दि. ०८ (जिमाका) : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत जेष्ठ नागरीकांसाठी 'मुख्यमंत्री वयोश्री योजना' सुरु करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत ६५ वर्षे व त्यावरील जेष्ठ नागरिकांना त्यांच्या दैनंदिन जीवनात सामान्य स्थितीत जगण्यासाठी आणि त्यांच्या वयोमानपरत्वे येणाऱ्या दिव्यांगत्व, अशक्तपणा यावर उपायोजना करण्यासाठी आवश्यक सहाय्य साधने व उपकरणे खरेदी करण्यासाठी, तसेच मन:स्वास्थ केंद्र योगोपचार केंद्राद्वारे मानसिक स्वास्थ्य अबाधित ठेवण्यासाठी प्रबोधन व प्रशिक्षणासाठी एकवेळ एकरकमी ३ हजार रुपये इतकी रक्कम पात्र लाभार्थ्यांच्या बँकेच्या वैयक्तिक आधार संलग्न बचत खात्यात डीबीटी प्रणालीद्वारे थेट लाभ वितरण केले जाणार आहे. तरी जिल्ह्यातील जास्तीत जास्त पात्र नागरिकांनी या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले आहे.

मुख्यमंत्री वयोश्री योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदारचे छायाचित्र, ओळखीचा पुरावा (मतदार ओळखपत्र किंवा पारपत्र किंवा वाहन चालक परवाना), पत्त्याचा पुरावा (शिधापत्रिका किंवा सातबारा आणि ८ अ चा उतारा किंवा वीज देयकाची छायांकित प्रत), वयाचा पुरावा (जन्म दाखला किंवा शाळा सोडल्याचा दाखला किंवा इतर पुरावा), आधार कार्डची छायांकित प्रत, राष्ट्रीयकृत बँक पासबुक किंवा कॅन्सल चेकची छायांकित प्रत, उत्पनाचे प्रमाणपत्र अथवा स्वयंघोषणापत्र, शासनाच्या इतर योजनेमधून लाभ घेतला नसल्याचे स्वयंघोषणापत्र, इतर स्वयंघोषणापत्र, ओळख पटविण्यासाठी अन्य कागदपत्रे पॅनकार्ड अथवा इतर पेन्शन योजनेचे ओळखपत्र सादर करावे.

लातूर जिल्ह्यात ही योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी कृती आराखडा तयार केला असून ग्रामीण स्तरावर लातूर जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), तर शहरी भागात लातूर महानगरपालिका उपायुक्त आणि नगरपालिका प्रशासनचे जिल्हा सहआयुक्त यांना नोडल अधिकारी नेमण्यात आलेले आहे. नोडल अधिकारी यांनी जेष्ठ नागरिकांच्या आरोग्य तापासणी शिबिरांसाठी ग्रामपंचायत, शहरीस्तरावर प्राथमिक आरोग्य केंद्रातील अधिकारी, कर्मचारी, ग्रामसेवक, आशा वर्कर तसेच महानगरपालिकेतील आरोग्य कर्मचारी व वसुली निरीक्षक यांची समिती स्थापन करून संबंधित अधिकारी-कर्मचारी यांनी जेष्ठ नागरीकांचे घरोघरी जावून सर्वेक्षण व स्क्रिनिंग करण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत.

मुख्यमंत्री वयोश्री योजनेचे पात्र लाभार्थ्यांचे अर्ज संकलित करून सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, लातूर या कार्यालयाकडे जमा करावेत. जेष्ठ नागरिकांनी या योजनेसाठी सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयाशी संपर्क साधावा. तसेच ही योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी जनतेने सहकार्य करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी केले आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेस आमदार अपात्रता प्रकरणाचा लवकरच फैसला

नवी दिल्ली, : राष्ट्रवादी काँग्रेस आमदार अपात्रता प्रकरणावर २३ जुलैला सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेस आमदार अपात्रता प्रकरणात शिवसेनेप्रमाणेच विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांनी दोन्ही बाजूंच्या आमदारांना पात्र ठेवले होते. विधानसभा अध्यक्षांच्या या निर्णयाविरोधात राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. राष्ट्रवादी काँग्रेस आमदार अपात्रता प्रकरणावर २३ जुलैला सुनावणी नागालँडमधील राष्ट्रवादीच्या सात आमदारांना नोटीस अध्यक्षांच्या या निर्णयाविरोधात शरद पवार गटाने सर्वोच्च न्यायालयात धाव अजित पवार गटाचे सर्व आमदार अपात्र झाले पाहिजेत अशी शरद पवार गटाची मागणी आहे. सदर प्रकरण शरद पवार गटाच्या वतीने ज्येष्ठ वकील अभिषेक मनु सिंघवी यांनी सरन्यायाधीशांकडे नमूद करून घेतले. त्यावर सरन्यायाधीशांनी २३ जुलैची तारीख दिली आहे. त्यामुळे आता राष्ट्रवादी काँग्रेस आमदार अपात्रता प्रकरणावर २३ जुलैला सुनावणी होणार आहे. सर्वोच्च न्यायालयाची नागालँडमधील राष्ट्रवादीच्या सात आमदारांना नोटीस नागालँडमधील राष्ट्रवादीच्या आमदार अपात्रता प्रकरणावर सर्वोच्च न्यायालयाने नागालँड विधानसभेतील राष्ट्रवादीच्या सात आमदारांना नोटीस बजावली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फुट पडल्यानंतर नागालँडमधील राष्ट्रवादीचे सर्व सात आमदार अजित पवारांसोबत गेले होते. या सात आमदारांविरुद्ध शरद पवार गटाने विधानसभा अध्यक्षांकडे याचिका दाखल केली होती.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE